। लातूर । वर्ष ३४ वे । अंक २०६ वा । शुक्रवार, दिनांक ०७ नोव्हेंबर २०२५ । पृष्ठे ६ । किंमत १ रू.

RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

(सांज दैनिक)

प्रकाशन: लातूर

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

Email-dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

## ‘वंदे मातरम् म्हणजे एक मंत्र, एक ऊर्जा, एक स्वप्न, एक प्रेरणा’: पंतप्रधान नरेंद्र मोदी

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था:** भारताचं राष्ट्रीय गीत ‘वंदे मातरम’च्या निर्मितीला १५० वर्षे पूर्ण झाले आहेत. या निमित्ताने देशभरात विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत. या पार्श्वभूमीवर आज (७ नोव्हेंबर) दिल्लीत ऐतिहासिक कार्यक्रम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत कार्यक्रम पार पडला आहे. यावेळी ‘वंदे मातरम’च्या १५० व्या वर्धापन दिनानिमित्त पंतप्रधान मोदी यांनी एक स्मारक टपाल तिकीट आणि एक स्मारक नाणं दखील प्रकाशित केले.

भारताच्या स्वातंत्र्य लढ्याला प्रेरणा देणाऱ्या ‘वंदे मातरम’ या गीताचे महत्त्व नवीन पिढीपर्यंत पोहोचवणं हे या कार्यक्रमाचा उद्देश असल्याचे सांगण्यात आलं आहे. तसेच या कार्यक्रमात बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महत्वाचे भाष्य देखील केले आहे. ‘वंदे मातरम्, हे शब्द एक मंत्र, एक ऊर्जा, एक स्वप्न, एक संकल्प आहेत’, असं नरेंद्र मोदींनी म्हटलं आहे.

**पंतप्रधान मोदी काय म्हणाले?**

वंदे मातरम्, हे शब्द एक मंत्र, एक ऊर्जा, एक स्वप्न, एक संकल्प आहेत. वंदे मातरम् हे शब्द भारतमातेची भक्ती आहेत, भारतमातेची आराधना आहेत. एवढंच नाही तर वंदे मातरम् हे शब्द आपल्याला इतिहासात परत घेऊन जातात आणि आपल्या वर्तमानाला नवा आत्मविश्वास आणि आपल्या भविष्याला प्रेरणा देतात. ‘वंदे मातरम्’ हे शब्द म्हणजे असा कोणताही संकल्प नाही जो साध्य करता येत नाही, असं कोणतंही ध्येय नाही जे आपण साध्य करू शकत नाही, म्हणजेच वंदे मातरम्, असं पंतप्रधान मोदींनी म्हटली आहे.

‘वंदे मातरम्’ स्वातंत्र्य चळवळीचा आवाज बनलं होतं’



वंदे मातरम् हे शब्द आपल्यामध्ये एक आत्मविश्वास निर्माण करतात. आपल्याला हे शब्द बळ देतात. हे गीत पिढ्यानपिढ्या भारतीयांच्या हृदयात उत्साह आणि देशभक्ती निर्माण करतं. ‘वंदे मातरम्’ केवळ एक गीत नव्हतं तर स्वातंत्र्यलढ्याचा आवाज होता. ज्यामुळे प्रत्येक क्रांतिकारी भारत माता की जय म्हणू लागला. याच भावनेने देशाला गुलामगिरीतून मुक्त होण्याची ताकद दिली.

गुलामगिरीच्या काळ्या काळात, ‘वंदे मातरम्’ हा भारतमातेच्या मुक्तीचा मंत्र बनला. या गाण्याने प्रत्येक भारतीयाच्या मनात हा संकल्प जागृत केला की भारतमातेची मुले स्वतः चे भाग्य स्वतः बनवती, असे मोदींनी म्हटलं आहे.

पंतप्रधान मोदी पुढे म्हणाले की, हे येणारे वर्ष देशाच्या एकतेचं, अखंडतेचं आणि राष्ट्रीय अभिमानाचे प्रतीक बनेल. हा उत्सव भारताला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या आणि आजही आपल्याला प्रेरणा देणाऱ्या आत्म्याला पुनरुज्जीवीत करेल. वंदे मातरम् हा केवळ इतिहास नाही, तर तो भारताच्या अस्तित्वाची ओळख आहे, असंही पंतप्रधान मोदींनी म्हटलं आहे.

## लातूर शहरात गुंगीकारक औषध विक्रेत्यावर पोलिसांची कारवाई

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहरातील नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण करणारी व प्रिस्क्रिप्शनशिवाय विकली जाणारी गुंगीकारक औषधे विक्री करणाऱ्या लातूरातील एका मेडिकल दुकानावर पोलिसांनी कारवाई केली आहे. या कारवाईमुळे शहरातील अवैध औषध विक्री साखळीवर आळा बसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दि. ०६ नोव्हेंबर २०२५ रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी समीरसिंह साळवे यांना माहिती मिळाली की, जुन्या रेल्वे स्टेशनच्या परिसरात एका कारमध्ये एक इसम नशा करीत आहे. त्यानुसार पोलिसांनी पंचासह त्या ठिकाणी छापा टाकला असता, संबंधित इसम नशेच्या अवस्थेत आढळून आला.

त्याची झडती घेतली असता, त्याच्याकडून Tapentadol या घटकाचे Schedule H1 प्रकारातील प्रिस्क्रिप्शनशिवाय विक्रीस बंदी असलेल्या औषधांच्या गोळ्या, इंजेक्शन सिरिंज, वायग्रा गोळ्या, लायटर, चिल्लम, सुई, बेल्ट, रक्ताचे डाग लागलेले कपड्याचे तुकडे अशा विविध वस्तू पोलिसांनी जप्त केल्या.

सदर व्यक्तीकडे औषधांचे प्रिस्क्रिप्शन मागविल्यावर त्याने ते नसल्याचे सांगितले. तसेच गेल्या तीन महिन्यांपासून तो गांधी चौकातील सदरील मेडीकल दुकानातून ही औषधे विनाप्रिस्क्रिप्शन खरेदी करत असल्याचे कबूल केले.

या प्रकरणी पोलीस अंमलदार महेश पारडे यांच्या फिर्यादीवरून वारद मेडिकलचे मालक यांच्याविरुद्ध पोलीस स्टेशन गांधी चौक, लातूर येथे गुन्हा क्र. ५१६/२०२५, कलम १२३ बीएनएस अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

या कारवाईनंतर लातूर शहरात प्रिस्क्रिप्शनशिवाय विक्री होणाऱ्या गुंगीकारक औषधांविरुद्ध विशेष मोहीम राबविण्याचा निर्णय पोलिसांनी घेतला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक श्री. मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी समीरसिंह साळवे व त्यांच्या पथकातील महेश पारडे, अरविंद वाघमोडे, गणेश मोरे, राहुल क्षिरसागर आणि रविसन जाधव यांनी केली.

या प्रकरणी पोलिस अधिक तपास करीत आहे.

या कारवाईमुळे लातूर शहरातील गुंगीकारक औषधांच्या अवैध विक्रीविरोधात पोलिसांनी उचललेले हे ठोस पाऊल असल्याची नागरिकांकडून प्रशंसा व्यक्त होत आहे.

## ट्रकची दोघांना जोराची धडक

### एकाचा मृत्यू तर दुसरा गंभीर जखमी

**लातूर/प्रतिनिधी :** येथील नाईक चौकातील गिल्डा टायर्ससमोरील ट्रकची रस्ता क्रॉस करणाऱ्या दोन व्यक्तींला धडक दिली. पाहाणाऱ्यानी सदरील भीषण अपघात झाला असल्याचे सांगितले. ट्रकची जोरदार धडक लागल्याने दोघेही सुमारे ८ फूट उंच उडून रस्त्यावर पडले.

त्यापैकी एक व्यक्ती जागीच मृत अवस्थेत दिसून आला तर दुसऱ्या व्यक्तीस उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

## भटक्या कुत्र्यांना तात्काळ हटवा, सर्वोच्च न्यायालयाचे महत्त्वपूर्ण आदेश; प्रशासकीय अधिकाऱ्यांना धरणार जबाबदार!

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था:**

गेल्या काही महिन्यांपासून भटक्या कुत्र्यांचा मुद्दा चर्चेत आला होता. भटक्या कुत्र्यांनी केलेल्या हल्ल्यामध्ये लहान मुले, वृद्ध आणि सामान्य नागरिक मोठ्या प्रमाणावर जखमी होत असल्याचं समोर आले होते. या पार्श्वभूमीवर एकीकडे भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त केला जावा, अशी मागणी केली जात होती, तर दुसरीकडे श्वानप्रेमींकडून कुत्र्यांबाबत भूतदयेच्या दृष्टीकोनातून विचार करावा, अशी मागणी केली जात होती. हे प्रकरण थेट देशाच्या सर्वोच्च न्यायालयात पोहोचलं. शेवटी सर्वोच्च न्यायालयात सविस्तर सुनावणी झाल्यानंतर आज न्यायालयाने याबाबत महत्त्वपूर्ण आदेश दिले आहेत.

भटक्या कुत्र्यांबाबत सर्वोच्च न्यायालयाचा आदेश

न्यायमूर्ती विक्रम नाथ, न्यायमूर्ती संदीप मेहता व न्यायमूर्ती एन. व्ही. अंजारिया यांच्या खंडपीठाने आज भटक्या कुत्र्यांच्या मुद्द्यावर आदेश जारी केले. यानुसार, सर्व सार्वजनिक ठिकाणांवरून भटक्या कुत्र्यांना ताबडतोब हटवण्यात यावे, असे न्यायालयाने म्हटले आहे. शैक्षणिक संस्था, रुग्णालये, क्रीडा संकुल, बस स्थानक व डेपो, रेल्वे स्थानक अशा ठिकाणच्या सर्व भटक्या कुत्र्यांना ताबडतोब तिथून हलवून त्यांच्यासाठीच्या विशेष निवारा व्यवस्थेमध्ये ठेवावं असे आदेश न्यायालयाने दिले आहेत.



तसेच, त्याआधी या कुत्र्यांची नसबंदी व लसीकरण देखील केले जावे, असेही न्यायालयाने नमूद केलं आहे.

दरम्यान, ज्या ठिकाणहून भटक्या कुत्र्यांना पकडून त्यांचं निर्बिजीकरण केलं आहे, त्यांना पुन्हा त्या भागात सोडू नये, असे निर्देशही न्यायालयाने यावेळी दिले आहेत. आम्ही पूर्ण विचाराअंती हे आदेश दिले आहेत की ज्या ठिकाणाहून भटक्या कुत्र्यांना पकडलं आहे, तिथे त्यांना पुन्हा सोडण्यात येऊ नये. कारण असं केल्यास अशा सार्वजनिक ठिकाणी या कुत्र्यांमुळे होणारा मनस्ताप कमी करण्याच्या मूळ भूमिकेलाच धक्का बसेल, असं न्यायालयाने यावेळी म्हटलं. यासंदर्भात निर्बिजीकरणानंतर कुत्र्यांना पुन्हा सोडून देण्याचा मुद्दा सुनावणीदरम्यान उपस्थित करण्यात आला होता. त्यावर न्यायालयाने हे स्पष्ट निर्देश दिले.

## गहिनीनाथ महाराज यांच्या कीर्तनात भक्तिरसात न्हाऊन निघाला औसा

**औसा/प्रतिनिधी :** औसा शहर भक्तिरसाने ओतप्रोत भरून गेले, कारण महाराष्ट्र शासन सांस्कृतिक कार्य विभाग आणि सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने औसा येथील श्री नाथ मंगलकार्य येथे आयोजित राज्यस्तरीय कीर्तन महोत्सवात श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर, पंढरपूर समितीचे सहअध्यक्ष सद्गुरु श्री गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या कीर्तनाने अविस्मरणीय भक्तीमय वातावरण निर्माण झाले.

महोत्सवाच्या या सत्रात औसेकर महाराजांनी आपल्या अद्वितीय आणि प्रभावी कीर्तन शैलीतून समाजप्रबोधन आणि अध्यात्म यांचा सुंदर संगम साधला. त्यांच्या कीर्तनाचा प्रारंभ श्री विठ्ठल नामस्मरणाने झाला आणि नामातच सारा ब्रह्मांडाचा गाभा आहे या संदेशाने उपस्थितांच्या हृदयात भक्तिभाव जागवला. औसेकर महाराजांनी संत तुकाराम, ज्ञानेश्वर आणि नामदेवांच्या अभंगांच्या माध्यमातून भक्ती, कर्तव्य आणि साधना या त्रिसूत्रीचा अर्थ स्पष्ट केला.सभोवताली उपस्थित शेकडो भाविकांनी ज्ञानोबा माऊली, तुकाराम या घोषणांनी वातावरण दुमदुमून टाकले. त्यांच्या कीर्तनात सामाजिक संदेशाची सांगड भक्तीभावाशी घालण्यात आली. केवळ मंदिरे बांधून नव्हे, तर मनातील अहंकाराचे भिंती पाडल्याशिवाय विठ्ठल भेटत नाही असा आशय त्यांनी आपल्या प्रगल्भ विचारांमधून मांडला.

या कीर्तन प्रसंगी परिसरातील विविध गावांतील कीर्तनादरम्यान त्यांनी आजच्या पिढीसमोरील सामाजिक प्रश्नांवर भाष्य करताना, पालकांनी संस्कार, प्रेम आणि सहिष्णुता यांचा वारसा पुढील पिढीला दिला पाहिजे, असा महत्त्वपूर्ण संदेश दिला. समाजात प्रेम, ऐक्य आणि परस्पर आदर टिकवायचा असेल, तर नामस्मरण आणि संतवाङ्मय हेच आपले आधारस्तंभ आहेत, असे ते म्हणाले. कार्यक्रमाच् या शेवटी औसेकर महाराजांनी सर्वांना विठ्ठलनामाचा जप करण्याचे आवाहन केले. नाम स्मरण केल्याने मन शुद्ध होते, आणि मन शुद्ध झालं की समाजही शुद्ध होतो. भक्ती ही केवळ पूजा नसून, ती आचरणाची पावित्र्य भावना आहे, असे सांगत त्यांनी आपले कीर्तन समाप्त केले. गावांतील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून भक्तीभावाने कीर्तनाचा आनंद लुटला. संपूर्ण सभागृहात हरिनामाचा जयघोष होत असताना उपस्थितांचे डोळे पाणावले होते.

## लातूर जिल्ह्यातील नगरपरिषद/नगरपंचायत निवडणूक: काँग्रेसची जोरदार तयारी सुरू!

### उमेदवारी अर्जांची प्रक्रिया सुरू; ९ नोव्हेंबर अंतिम मुदत

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्ह्यातील उदगीर,अहमदपूर, निलंगा आणि अवसा नगरपरिषद तसेच रेनापुर नगरपंचायत निवडणुकीच्या रणधुमाळीला सुरुवात झाली असून.आगामी नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकीसाठी लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीने युध्दपातळीवर तयारी सुरू केली आहे. जिल्हाध्यक्ष अभय साळुंके यांनी आज (गुरुवार) पक्षाचे अधिकृत प्रसिद्धीपत्रक जारी करत इच्छुक उमेदवारांच्या अर्ज स्वीकारण्याची प्रक्रिया आणि उमेदवारी अंतिम करण्याच्या तारखांचा संपूर्ण रोडमॅप जाहीर केला. निवडणुका जिंकण्यासाठी पक्षाने संपूर्ण वेळापत्रक अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने आखले असून, संपूर्ण प्रक्रिया लातूरमधील काँग्रेस भवन येथूनच पार पडणार आहे.

**अर्ज स्वीकारण्याची प्रक्रिया आणि अंतिम मुदत**

जिल्हाध्यक्ष अभय साळुंखे यांनी सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि इच्छुक उमेदवारांना महत्त्वाचे आवाहन केले आहे. त्यानुसार इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज भरून सादर करण्याची अंतिम तारीख ९ नोव्हेंबर २०२५, सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत असेल.

हे अर्ज काँग्रेस भवन, लातूर येथे स्वीकारले जाणार असून काँग्रेसचे सोशल मीडिया जिल्हाध्यक्ष प्रवीण सूर्यवंशी आणि काँग्रेसच्या अध्यात्मिक आघाडीचे अध्यक्ष ह.भ.प. शरद देशमुख महाराज यांच्याकडे अर्ज स्वीकारण्याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

९ नोव्हेंबरला अर्ज स्वीकारण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर, दुसऱ्याच दिवशी म्हणजेच १० नोव्हेंबर २०२५ रोजी जिल्हा निवड समितीची बैठक होणार आहे. या बैठकीमध्ये दाखल झालेल्या सर्व अर्जांची छाननी करून,उमेदवारांच्या नावांची शिफारस तातडीने प्रदेश काँग्रेस कमिटीकडे पाठवण्यात येणार आहे. जिल्हा समितीने शिफारस केलेल्या नावांवर १२ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रदेश निवड समिती निर्णय घेणार आहे.प्रदेश निवड समिती या नावांवर अंतिम शिक्कामोर्तब करून उमेदवारांची यादी जाहीर करण्याची शक्यता आहे. जिल्हाध्यक्ष अभय साळुंके यांनी सर्व इच्छुकांनी वेळेचे बंधन पाळून आणि पक्षाच्या शिस्तीनुसार अर्ज दाखल करावेत, असे आवाहन प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे. अभय साळुंके यांच्या या स्पष्ट वेळापत्रकामुळे लातूर काँग्रेसने निवडणुकीसाठी कंबर कसल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

### कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



मंथनाला आयसीसी प्लेयर ऑफ द मंथ साठी नामांकन...

### चिमटा दयाचा



लातूरमध्ये गुन्हा करणाऱ्यांची धिंड पाहून पटनायकांची आठवण होत आहे ! अशा धाडसी निर्णयाचे स्वागत होत आहे !!

## भुमिपुत्र युवकांनी केला धिरज देशमुख यांचा सत्कार

### जिल्हा बँकांच्या भरतीत ७० टक्के जागा राखीव ठेवण्यासाठी प्रयत्न केल्याबद्दल आभार

**लातूर/प्रतिनिधी :** स्पर्धा परीक्षांची तयारी करुन नोकरी मिळवणाऱ्या बेरोजगार युवकांची संख्या मोठी आहे. त्या तुलनेत नोकर भरतीमध्ये रिक्त जागांची संख्या खूप कमी आहे. अशा परिस्थितीत राज्यातील सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या नोकर भरतीत स्थानिक जिल्ह्याचे रहिवाशी असलेल्या युवकांना ७० टक्के जागा राखीव ठेवण्यासाठी लातूर जिल्हा बँकेचे अध्यक्ष माजी आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी प्रभावी प्रयत्न केले. त्यांच्या प्रयत्नांना यश आल्यानंतर जिल्ह्याचे भूमिपुत्र असलेल्या युवकांना मोठा आनंद झाला. या आनंदातूनच जिल्ह्यातील युवकांनी एकत्र येत गुरुवारी (दि. ६) लातूर जिल्हा बँकेत श्री. धीरज देशमुख यांचा सत्कार केला.

भुमिपुत्रांसाठी केलेल्या प्रभावी प्रयत्नांबद्दल धिरज विलासराव देशमुख यांचे युवकांनी आभारही मानले.

काही महिन्यांपासून राज्यातील जिल्हा मध्यवर्ती बँकांतील नोकर भरतीच्या हालचाली सुरु आहेत. काही बँकांनी भरती प्रक्रियेच्या जाहिरातीही प्रसिद्ध केल्या आहेत. लातूर जिल्हा बँकेचे अध्यक्ष माजी आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी एकीकडे लातूर जिल्हा बँकेच्या नोकर भरतीचे नियोजन करत दुसरीकडे या भरतीमध्ये स्थानिक उमेदवारांना संधी मिळावी, यासाठी प्रयत्न केले. जिल्हा बँकेचे कार्यक्षेत्र हे जिल्ह्यापुरते मर्यादित असल्याने या भरतीत जिल्ह्यातील युवकांना मोठ्या प्रमाणात संधी मिळाली पाहिजे, यासाठी त्यांनी राज्याचे सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांना पत्र देऊन पाठपुरावा केला. बाहेरच्या जिल्ह्यातील शेतकरी व संस्थांचा जिल्हा बँकेशी तेवढा संबंध येत नाही. नोकर भरतीमध्ये स्थानिक उमेदवारांना प्राधान्य दिले तर त्यांच्याकडून बँकेच्या ग्राहक, सभासद व ठेवीदारांची चांगली सेवा घडून येईल, ही बाब माजी आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांना पटवून दिली. त्यानंतर सहकारमंत्री पाटील यांच्या पुढाकाराने काही दिवसापूर्वी जिल्हा बँकांच्या भरतीमध्ये स्थानिक जिल्ह्याचे रहिवाशी असलेल्या उमेदवारांसाटी ७० टक्के जागा राखीव ठेवण्याचा निर्णय शासनाने घेतला. भरतीत ३० टक्के जागा इतर जिल्ह्यातील रहिवाशी उमेदवारांसाठी राखीव ठेवताना या जागांवरही इतर जिल्ह्यातील उमेदवार पुरेशा प्रमाणात उपलब्ध न झाल्यास त्या जागांवर स्थानिक जिल्ह्याचे रहिवाशी असलेल्या उमेदवारांना संधी देण्याचाही निर्णय घेतला. याबाबतचा शासन निर्णय बाहेर पडताच राज्यभरातील स्थानिक जिल्ह्याचे रहिवाशी असलेल्या स्पर्धा परीक्षांतून नोकरीचे स्वप्न पाहणाऱ्या युवकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. अशा लातूर जिल्ह्यातील युवकांनी गुरुवारी एकत्र येऊन जिल्हा बँकेच्या मुख्यालयात बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांचा सत्कार केला. तुमच्यामुळेच जिल्हा बँकेच्या भरतीत ७० टक्के जागा राखीव ठेवण्याचा निर्णय झाल्याचे सांगत सर्वांनी धिरज विलासराव देशमुख यांचे आभार मानले.



युवक व शेतकऱ्यांच्या मुलांच्या हक्कांसाठी मी शासनाकडे पाठपुरावा केला. शासनालाही माझे म्हणणे पटले आणि जिल्हा बँकांच्या भरतीत स्थानिक रहिवाशी युवकांना ७० टक्के जागा राखीव ठेवण्यात आल्या. यापुढील काळातही युवक व शेतकऱ्यांच्या मुलांसाठी आपला लढा कायम राहणार आहे, असे माजी आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी युवकांना सांगितले.

# आता भारतासाठी अमेरिकेला रशियाचे तेल नकोसे?




आंतरराष्ट्रीय राजकारण आणि अर्थकारण यांचा एकमेकांशी जवळचा संबंध असतो. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अलीकडेच जपान, दक्षिण कोरिया आणि चीन यांच्याशी केलेल्या व्यापार करारांतून ही बाब स्पष्ट होते. सर्व देशांना अमेरिकेशी व्यापारी संबंध अबाधित ठेवायचे आहेत. भारताची स्थितीही वेगळी नाही. रशियाकडून भारत खनिज तेल मोठ्या प्रमाणावर खरेदी करत आहे. सप्टेंबरमध्ये दररोज १६ लाख १० हजार पिंपे तेल रशियातून भारतात येत होते. ऑक्टोबरमध्ये १६ लाख २० हजार पिंपे येत होते; पण गेल्या ऑक्टोबरच्या तुलनेत ही खरेदी ८ टक्क्यांनी घटली आहे. गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये दररोज सरासरी १७ लाख ५० हजार पिंपे तेल भारत रशियाकडून घेत होता. तेलाच्या आयातीतील तूट भरून काढण्यासाठी इराक आणि सौदी अरेबियाकडून तेलाची खरेदी भारताने वाढवली आहे. इराककडून दररोज ८ लाख २६ हजार पिंपे तर सौदी अरेबियाकडून ६ लाख ६९ हजार पिंपे तेल भारतास पुरवले जात आहे. या काळात अमेरिकेतून भारताची खनिज तेलाची खरेदी वाढली आहे ही उल्लेखनीय बाब आहे. ऑक्टोबरमध्ये सरासरी दररोज ५ लाख ६८ हजार पिंपे तेल अमेरिकेतून भारतात आले. अमेरिकेने रशियाच्या तेल निर्यातीवर निर्बंध जाहीर केले हे त्यामागचे कारण आहे.

**अमेरिकेचे दडपण**

भारत व चीन रशियाकडून खनिज तेल खरेदी करून युक्रेन विरुद्धच्या युद्धासाठी रशियाला पैसा पुरवत असल्याचा आरोप ट्रम्प यांनी पूर्वी वारंवार केला आहे. रशियातील रोझनेफ्ट व लुकऑईल या दोन कंपन्यांवर अमेरिकेने निर्बंध घातले. त्याची अंमलबजावणी येत्या २१ नोव्हेंबरपासून होणार आहे. रशियाच्या खनिज तेलाच्या निर्यातीपैकी सुमारे ५७ टक्के निर्यात या दोन कंपन्यांमार्फत होते. निर्बंधाच्या घोषणेनंतर भारतीय तेल शुद्धीकरण व विक्री कंपन्यांनी रशियाकडून तेलाची खरेदी लक्षणीयरीत्या कमी केली. गेल्या महिन्याच्या पूर्वार्धात भारत सरासरी दररोज १९ लाख ५० हजार पिंपे तेल रशियाकडून घेत होता. मात्र २७ ऑक्टोबर रोजी संपलेल्या आठवड्यात ती सरासरी ११ लाख ९० हजार पिंपांपर्यंत कमी झाली. सरकारी क्षेत्रातील हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन व मित्तल एनर्जी या खासगी कंपन्यांनी रशियन तेलाची खरेदी थांबवत असल्याचे जाहीर केले. इंडियन ऑईल कॉर्पोरेशन ही सरकारी क्षेत्रातील तेल शुद्धीकरण व विक्री करणारी बडी कंपनी आहे. आंतरराष्ट्रीय समुदायाने घातलेल्या निर्बंधाचे आपण पालन करू असे तिने म्हटले आहे. रिलायन्स ही खासगी क्षेत्रातील खूप मोठी तेल कंपनी आहे. रशियातून येणार्या खनिज तेलापैकी जवळपास निम्मी आयात ही कंपनी करते. निर्बंधांच्या संदर्भात सरकारी मार्गदर्शक तत्त्वांचे आपण पूर्ण पालन करू असे रिलायन्सनेही स्पष्ट केले आहे. खनिज तेलाची गरज भागवण्यासाठी पश्चिम आशिया, पश्चिम आफ्रिका, दक्षिण अमेरिकेतील देशांतून आयात वाढवली जात आहे. अमेरिकेबरोबर द्विपक्षीय व्यापार कराराच्या चर्चेत त्या देशाकडून जास्त तेल खरेदी करण्याचे भारताने कबूल केले आहे. संयुक्त राष्ट्रेही एखाद्या देशावर निर्बंध लादते; मात्र ते बहुधा मार्गदर्शक स्वरूपाचे असतात. अमेरिकेचे निर्बंध व्यापक असतात. एखादा देश किंवा कंपनी यांना त्यात लक्ष्य केले जातेच; पण जे देश किंवा कंपन्या अशा कंपन्यांशी व्यवहार करतात त्यांनाही लक्ष्य केले जाते. गेल्या जुलैमध्ये मायक्रोसॉफ्ट या अमेरिकन कंपनीने गुजरात मधील नायारा एनर्जी या कंपनीची सॉफ्टवेअर सेवा स्थगित केली. कारण या कंपनीत रशियाचे भांडवल गुंतले आहे. भारतीय तेल शुद्धीकरण कंपन्या व अनेक बँका अमेरिकन सॉफ्टवेअर वापरतात, त्यामुळे त्यांच्यावर व भारतावर अमेरिका सहज दडपण आणू शकतो. आपली ऊर्जेची गरज भागवण्यासाठी भारत कोठूनही तेल खरेदी करू शकतो, असे परराष्ट्र मंत्री काही काळापूर्वी म्हणाले होते. हा बाणेदारपणा आता उपयोगी पडणार नाही. भारत त्याच्या गरजेच्या ८८ टक्के तेल आयात करतो. निर्बंधांमुळे रशियन तेलाची आयात कमी करून अमेरिकेचे तेल घेणे आता भारताला भाग आहे.



# आता बिबट्यांची दहशत



**लोक रस्त्यावर उतरल्यावर शासकीय यंत्रणांची धावपळ उडाली. मंचरमध्ये नागरिकांनी रात्रभर ठिय्या आंदोलन केले. प्रभावी उपाययोजना झाल्या नाहीत तर काय घडू शकते, याची चुणूक या आंदोलनांमधून दिसली. पुणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागात बिबट्यांनी दहशत निर्माण केली असून रहिवाशांच्या सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. शिरूर तालुक्यातील पिंपरखेड येथे रोहन या बारा वर्षांच्या मुलाला बिबट्याने झडप घालून ठार केले. अंगणात खेळत असलेल्या या मुलाचा अकाली बळी गेला**

. याच गावामध्ये अवघ्या पंधरा दिवसांपूर्वी एका पाच वर्षांच्या मुलीला बिबट्याने ठार केले. आंबेगाव, शिरूर या भागात बिबट्यांकडून धुमाकूळ सुरू आहे. ग्रामस्थ हतबल झाले आहेत. घटना घडून गेल्यावर जागे व्हायचे, हा शासकीय यंत्रणांचा परिपाठ. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये कमालीचा संताप दिसतो. बिबट्यांना पकडण्यासाठी पिंजरे लावले म्हणजे काम झाले, ही भूमिका समर्थनीय नाही. पिंपरखेडमध्ये बालिकेचा बळी गेल्यावर या परिसरात पिंजरे लावले गेले. त्यात चार बिबटे अडकल्याने, आता धोका टळला, ही भावना झाली; मात्र आणखी एक बळी गेला. त्यामुळे ग्रामस्थांच्या संतापाचा स्फोट होणे स्वाभाविक होते. वनविभागाचे पिंपरखेड येथील कार्यालय ग्रामस्थांनी पेटवून दिले, वाहने जाळली. यंत्रणांच्या अपयशाबद्दलचा रोष किती टोकाला पोहोचला आहे, याचे हे उदाहरण. केवळ जाळपोळ करून आंदोलन थांबलेले नाही. बेल्हे-जेजुरीसह काही मार्ग ग्रामस्थांनी रोखून धरले. आंदोलनाचे लोण ग्रामीण भागात अनेक ठिकाणी पसरले हाच शासनाच्या अपयशाचा ढळढळीत पुरावा होय! आपले प्रश्न सोडविण्यासाठी लोकांना स्वतःच रस्त्यावर यावे लागणे, यासारखी दुसरी नामुष्की असू शकत नाही. या आंदोलनाच्या रेट्यामुळे आणि ग्रामस्थांच्या संतापामुळे यंत्रणा थोड्याफार हलल्याचे चित्र दिसले. या पार्श्वभूमीवर नरभक्षक बिबट्याला गोळ्या घालून ठार करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. मानवी वस्तीत बिबट्यांचा वावर, हे आता अचानक घडले, असे नाही. शिरूर आणि आंबेगाव तालुक्यात या घटना नव्या नाहीत. उसाचे फड हे बिबट्यांसाठी सुरक्षित आश्रयस्थान ठरते. बेसुमार वृक्षतोडीमुळे जंगले विरळ झाली, खाद्याच्या शोधात वन्यप्राणी मानवी वस्तीकडे येऊ लागले. मानव- वन्य प्राणी संघर्षाचे मूळ त्यात आहे; पण आर्थिक समीकरणांचे गणित गुंतलेले असल्याने तो प्रश्न सुटण्याच्या पलीकडे गेला आहे. मग ग्रामीण भागातील जनजीवन सुरक्षित करण्यासाठी मोजकेच पर्याय राहतात. तेही अंमलात आणण्यामध्ये गंभीर दृष्टिकोन दाखवला जात नाही.

आता जाग आली...

बिबट्यांचा उपद्रव रोखण्यासाठी माणिकडोहमध्ये बिबटा निवारा केंद्र उभारण्यात आले. मानवी वस्तीतून पकडलेले बिबटे निवारा केंद्रात पाठवले; पण यातून मानवी बळींचे चक्र थांबले का? याचे उत्तर नकारार्थी आहे. आता तर पकडलेले बिबटे निवारा केंद्रात ठेवण्यासही ग्रामस्थांचा विरोध आहे. असे असताना दोनशे बिबटे ठेवण्यासाठी शिरूरमध्ये एक निवारा केंद्र उभारले जाणार आहे. नव्याने पकडलेले बिबटे 'वनतारा' अभयारण्यात पाठविण्याचा पर्याय पुढे आला आहे. पुढील सहा महिन्यांत पाचशे ते सहाशे बिबटे 'वनतारा'मध्ये सोडले जाण्याची शक्यता आहे.

ही संख्या पाहून दडपून जायला होईल! ग्रामस्थांकडून रोजचा दिवस कसा ढकलला जात असेल, याची यावरून कल्पना करता येईल! बिबटे पकडण्यासाठी पुण्याच्या ग्रामीण भागात दोनशे पिंजरे बसविण्यात आले आहेत. आणखी दोनशे पिंजरे खरेदी करण्याची योजना आहे.

त्यासाठी दहा कोटीचा तातडीचा निधी मंजूर करण्यात आला आहे. बिबट्यांची नसबंदी, कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित धोक्याचा इशारा देणारी यंत्रणा, असे व्यावहारिक पर्याय पुढे आले आहेत. धोक्याचा इशारा देणारी यंत्रणा ही तर पुणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागाची तातडीची गरज आहे. त्यासाठी वनविभाग आणि अन्य शासकीय यंत्रणा युद्धपातळीवर हालचाल करणार का, हा खरा प्रश्न. लोकभावनेचा स्फोट झाल्यावरच बैठका, लोकप्रतिनिधींची लगबग, असे चित्र पुढच्या काळातही कायम राहणार असेल, तर ग्रामस्थांना सुरक्षिततेची ग्वाही कोण देणार? शिरूर परिसरात बाराहून अधिक बळी बिबट्यांमुळे गेले, हे धक्कादायक वास्तव स्वीकारून योग्य बदलासाठी पावले टाकावी लागतील. तरच ग्रामीण भाग सुरक्षित बनविता येईल.

# रिकाम्या पोटी २ लवंगा चावण्याचे फायदे

आजच्या धावपळीच्या जीवनात, लोक किरकोळ आजारांसाठी औषधांवर अवलंबून राहू लागले आहेत. तथापि, आयुर्वेद असे सुचवतो की या किरकोळ आजारांसाठी औषधांवर अवलंबून राहण्याऐवजी, तुम्ही घरगुती उपचार देखील करू शकता.या मध्ये लवंगा चावणे हे आरोग्यासाठी फायदेशीर आहे. लवंग हा स्वयंपाकघरात सहज आढळणारा मसाला आहे. रिकाम्या पोटी २ लवंगा चावण्याचे फायदे जाणून घ्या

वजन झपाट्याने कमी करण्यासाठी आजपासून आहारात या भाज्यांचा समावेश करा

हे केवळ अन्नाची चव वाढवत नाही तर सर्वात गंभीर आजारांपासूनही आराम देते.आयुर्वेदात, लवंगाला वरदान मानले जाते, जे शरीराची पचनशक्ती वाढवते. त्याच्या औषधी गुणधर्मांमुळे ते एक चमत्कारिक घरगुती उपाय बनते. पचनसंस्था मजबूत होते आयुर्वेद तज्ज्ञांच्या मते, सकाळी रिकाम्या पोटी लवंग चावल्याने गॅस, छातीत जळजळ, आंबट ढेकर येणे आणि बद्धकोष्ठता यासारख्या समस्या दूर होतात. ते यकृत सक्रिय करते आणि पोट स्वच्छ करण्यास मदत करते. जर तुम्हालाही गॅस, छातीत जळजळ, आंबट ढेकर येणे आणि बद्धकोष्ठता यासारख्या समस्या येत असतील तर तुम्ही सकाळी रिकाम्या पोटी लवंग चावून पाहू शकता.

**हृदयासाठी फायदेशीर–**लवंग चावल्याने केवळ गॅस, छातीत जळजळ आणि आंबट ढेकर येण्यापासून आराम मिळतोच, शिवाय रक्ताभिसरण सुधारते आणि कोलेस्टेरॉल नियंत्रित राहते. यामुळे हृदयविकाराचा झटका आणि उच्च रक्तदाबाचा धोका देखील कमी होतो.



## स्तनपान देणाऱ्या नवमातांसाठी खास ८ एक्सपर्ट टीप्स !

### डॉक्टर टीप्स



स्तनपानामुळे आई व बाळाचे नाते अधिक दृढ होते.मात्र स्तनपान करताना महीलांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. स्तनपानात बाळाचे पोषण व्यवस्थित होत आहे का?स्तनपान करताना कोणते पथ्य पाळावे? किंवा स्तनपान करताना काय करणे टाळावे? असे अनेक प्रश्न प्रत्येक आईच्या मनात निर्माण होतात.यासाठीच इन्टरनॅशनल बोर्ड

१. बाळाच्या जन्माआधीच आईने स्तपानासाठी काय तयारी करावी? कोणत्या चांगल्या किंवा वाईट गोष्टींचा स्तनपानावर प्रभाव पडतो? नुकत्याच करण्यात आलेला संशोधनानुसार बाळाच्या जन्माआधी स्तनपानासाठी कोणतीही विशेष तयारी गरज नाही.फक्त तुम्ही बाळाला स्तनपान करण्यासाठी मनाने तयार असायला हवे. गर्भधारणा,प्रसुती व बाळाचा जन्म या प्रक्रियेमध्ये स्तनपान ही एक नैसर्गिक गोष्ट आहे.

## विनोद




थम्सअप

बिचारा संता उदास बसलेला असतो...

बंता – तू परत उदास बसला आहे, आता काय झाले?

संता – यार थम्सअपच्या जाहिरातीने परेशान केले आहे.

बंता – काय झाले

संता – यार, बायको रोज राती थोडे थम्सअप पाजते आणि म्हणते ' चलो आज कुछ तूफानी करते हैं...'

## संदेश

Dialogue
Agar Feroz Khan Don Hota
To
Dialogue Kese Bolta??
"Mere Sar Par Baal Aane Ka
Intezaar To 11 Shehron Ke Naai
Kar Rahe Hen,
Par Mere Sar Par Baal Aana Mush-kil Hi Nahi Namumkin Bhi Hai..

## सुविचार



जो जिभेच्या अंकित आहे आणि झोपेच्या अधीन आहे तो अध्यात्माचा केव्हाही अधिकारी होऊ शकणार नाही.

– संत ज्ञानेश्वर


**संस्कृत सुभाषित**

**सदा लोकहिते युक्ता:**
**रत्नदीपा इवोत्तमा: ॥**

**अर्थ :** लोककल्याणात रममाण झालेले लोक रत्नाच्या दिव्याप्रमाणे कशाचीच अपेक्षा धरत नाहीत, तर ते दुसऱ्यासाठीच तेवत असतात.

# मनोरंजक महाशब्दकोडे

कोडे क्र.१९



### आडवे शब्द

१. पहारेकरी
६. टप्प्या-टप्प्याचा प्रवास
१२. माळ, हार
१३. नडलेला, गरजू
१४. डाळीचे कालवण
१५. सांभाळ, संगोपन
१७. गवताचे रुंद पान
१८. वेल
२०. शंभर
२२. प्रचंड
२४. आई
२५. गगन
२७. हद्दपार, वगळलेला
२८. कोय
२९. रोटीचे एक धान्य
३०. एक त्रिदल
३१. आवेशाने पुढे जाणे
३३. पोट
३४. सैन्याचा मालपुरवठा
३६. चिखलाची भुसभुशीत जमीन
३७. श्रीकृष्णाचे एक नाव
३८. रममाण, निमग्न
४०. कबूतर
४१. पुष्कळ
४३. हिंदुस्थानी
४५. भित्रा
४८. एक महाकाय प्राणी
४९. कुंभाराची भट्टी
५१. आत्मियता, करुणामय प्रेम
५२. पुरुष
५३. आकडेमोडीचे शास्त्र
५५. उद्योगी माणसाचा 'शत्रू'
५६. ठाकरे पुत्र
५८. भडीमार
५९. भीती
६१. रक्ताचा नात्यातील
६२. रतिचा पती
६५. आमनेसामने
६८. समुद्र
७०. ग्रामीण बोलीत तेव्हा
७१. जिम्मेदारी
७२. वेळ घालवणे
७४. अभिनेता
७५. त्वरित
७६. चप्पल
७७. गाय
७८. परंतु

### उभे शब्द

१. जीभ. जिव्हा
२. गाढव
३. निकट
४. दरवाजा
५. रात्र
६. हेतू-कारण
७. अंगावरील बारीक केस
८. फिर्याद, अर्ज
९. वाळवंट
१०. धरण, सरोवर, विहीर इ.
११. संगीतातील एक राग
१६. नकला करणारा
१७. सरसरीत
१९. धातूचा धागा
२१. मध
२२. सततचे नामस्मरण
२३. प्रत्येक वर्षी
२४. बिनविजेचा 'फ्रीज'
२५. आपला परका अशी भावना
२६. कपाळ
२८. स्वाभिमानी
२९. इंग्रजी आई
३१. कमीजबरोबरचे एक वस्त्र
३२. दात
३३. अगरबत्ती
३५. वेळ, फुरसत
३६. डोंगराचा तुटलेला कडा
३९. जरच्या बरोबरचा शब्द
४२. दाक्षिणात्य आमटी
४४. धनुष्यबाण
४६. भरीव नसलेले
४७. शिखराचे टोक
४९. व, आणखी
५०. कडक व चिवट
५२. एक क्षार
५४. फणसातील खाद्यभाग
५६. नाहक
५७. न्यूनता, कसर
६०. रसाळ
६१. मंत्रीमंडळ
६३. औषध
६४. हाकाटी, आरडाओरड
६६. मराठीत बाथरूम
६७. टोळी, सैन्याची तुकडी यांचा प्रमुख
६८. हिंमत, धैर्य
६९. तीव्र ऊन
७३. विहीर
७४. शर्त

### आडवे उत्तर

१.रखवालदार ६.मजल दरमजल १२.सर १३.गरजवंत १४.वरण १५.लालन १७.पात १८.लता २०.शतक २२.जबरदस्त २४.माय २५.आभाळ २७.कटाप २८.बाठ २९.मका ३०.पळस ३१.सरसावणे ३३.उदर ३४.रसद ३६.दलदल ३७.दामोदर ३८.रत ४०.पारवा ४१.फार ४३.भारतीय ४५.डरपोक ४८.हत्ती ४९.आवा ५१.कळकळ ५२.नर ५३.अंकगणित ५५.आळस ५६.उद्धव ५८.मारा ५९.डर ६१.सगा ६२.मदन ६५.समोरासमोर ६८.सागर ७०.तवा ७१.जबाबदारी ७२.कालहरण ७४.अदाकार ७५.ताबडतोब ७६.खेटर ७७.गे ७८.पण

### उभे उत्तर

१.रसना २.खर ३.लगत ४.दार ५.रजनी ६.मतलब ७.लव ८.दरखास्त १०.जलाशय ११.ललत १६.नकलाकार १७.पातळसर १९.तारा २१.मकरंद २२.जप २३.दर २४.माठ २५.आपपराभव २६.भाळ २८.बाणेदार २९.मदर ३१.सलवार ३२.रद ३३.उदबत्ती ३५.समय ३६.दरड ३९.तर ४२.सांबार ४४.तीरकमान ४६.पोकळ ४७.कळस ४९.आणि ५०.वातड ५२.नवसागर ५४.गरा ५६.उगा ५७.कमतरता ६०.रसदार ६१.सरकारी ६३.दवा ६४.बोंबाबोंब ६६.मोरी ६७.सरदार ६८.साहस ६९.रणरण ७३.आड ७४.अट



# क्रीडा विश्व



भारतीय महिला क्रिकेट संघाच्या सदस्यांनी नवी दिल्लीतील राष्ट्रपती भवनात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतली.

# भारताच्या फिरकी गोलंदाजांनी 'कांगारुं'चा उडवला धुव्वा!

ऑस्ट्रेलियाविरुद्ध भारताचे पारडे जड ; मालिकेत २-१ ने आघाडी; वॉशिंग्टनच्या फिरकीची जादूने ८ चेंडूत ३ बाद

कॅरारा : भारतीय संघाने गुरुवारी ऑस्ट्रेलियाला चौथ्या टी-२० सामन्यात ४८ धावांनी पराभूत केले. भारताच्या गोलंदाजांनी सामन्यात उत्कृष्ट कामगिरी केली. भारतीय संघाच्या प्रत्येक गोलंदाजाने सामन्यात विकेट घेत ऑस्ट्रेलियाला बॅकफूटवर टाकले. यासह भारतीय संघाने मालिकेत २-१ अशी आघाडी मिळवली आहे. या सामन्यात भारताच्या गोलंदाजांनी करह केला असून वॉशिंग्टन सुंदरने ३ बळी घेत आपल्या फिरकी गोलंदाजीचा अंदाज दाखवला. त्याचप्रमाणे अक्षर पटेल, शिवम दुबे यांनी प्रत्येकी २-२ विकेट्स घेतल्या. तर अर्शदीप, बुमराह व वरूणने १-१ विकेट घेतल्या.



क्विन्सलँडला झालेल्या चौथ्या टी-२० सामन्यात भारताने १६८ धावांचे लक्ष्य ऑस्ट्रेलियासमोर ठेवले होते. पण ऑस्ट्रेलियाला १८.२ षटकात सर्वबाद ११९ धावाच करता आल्या. भारतीय फिरकीपटूंनी या सामन्यात ऑस्ट्रेलियन फलंदाजांना चांगलेच सतावले. त्यामुळे सखोल फलंदाजी असतानाही ऑस्ट्रेलियाला भारताने दिलेल्या लक्ष्यापर्यंत पोहोचता आले नाही. ऑस्ट्रेलियाकडून कर्णधार मिचल मार्श आणि मॅथ्यू शॉर्ट यांनी डावाची सुरुवात केली. त्यांनी चांगली सुरुवात केली होती. पण ५ व्या षटकात मॅथ्यू शॉर्टला अक्षर पटेलने २५ धावांवर माघारी धाडले. त्यानंतर ९ व्या षटकात अक्षरनेच जोश इंग्लिसलाही १२ धावांवर त्रिफळाचीत केले. पुढच्याच षटकात शिवम दुबेने मिचेल मार्शचा अडथळा दूर केला. मार्शने २४ चेंडूत ३० धावा केल्या होत्या. पण नंतर टीम डेव्हिड आणि जोश फिलिप यांनी डाव सावरण्याचा प्रयत्न केला. परंतु, टीम डेव्हिडला दुबेने १४ धावांवर, तर फिलिपला अर्शदीप सिंगने १० धावांवर बाद केले. पण तोपर्यंत ऑस्ट्रेलिया ९८ धावांपर्यंत पोहोचले होते. त्यानंतर पुनरागमन करणारा ग्लेन मॅक्सवेलही फार काही करू शकला नाही. वरुण चक्रवर्तीने त्याला २ धावांवरच त्रिफळाचीत केले. तरी मार्कस स्टॉयनिसवर ऑस्ट्रेलियाच्या आशा होत्या. पण १७ व्या षटकात वॉशिंग्टन सुंदर पहिल्यांदाच गोलंदाजी करायला आला आणि त्याने सामना पूर्णपणे भारताच्या बाजूने झुकवला. त्याने या षटकात चौथ्या चेंडूवर मार्कस स्टॉयनिसला १७ धावांवर पायचीत केले, तर पुढच्याच चेंडूवर झेव्हियर बार्टलेटला शून्यावर स्वत:च झेल घेत माघारी धाडले.

तत्पुर्वी, भारताने प्रथम फलंदाजी करताना २० षटकात ८ बाद १६७ धावा केल्या होत्या. भारताकडून शुभमन गिलने सर्वाधिक ४६ धावांची खेळी केली. तसेच अभिषेक शर्माने २१ चेंडूच २८ धावा केल्या, तर शिवम दुबे २२ धावा, कर्णधार सूर्यकुमार यादव २० धावा आणि अक्षर पटेल नाबाद २१ धावा केल्या. पण भारताकडून कोणालाही मोठी खेळी करता आली नाही. ऑस्ट्रेलियाकडून नॅथन एलिस आणि ॲडम झाम्पा यांनी प्रत्येकी ३ विकेट्स घेतल्या. झेव्हियर बार्टलेट आणि मार्कस स्टॉयनिस यांनी प्रत्येकी १ विकेट घेतली.

शिवम दुबेचा गगनचुंबी षटकार

चौथ्या टी-२० सामन्यात, शिवम दुबेने एक गगनचुंबी षटकार मारला, ज्यामुळे खेळ काही वेळासाठी थांबवावा लागला. शिवम दुबेने ॲडम झाम्पाच्या चेंडूवर एक जबरदस्त षटकार खेचला आणि चेंडू थेट मैदानाबाहेर गेल्याने नवा चेंडू आणावा लागला. अभिषेक शर्मा व शुबमन गिलची जोडी भारताकडून सलामीसाठी उतरली होती. पण खालच्या फलंदाजी फळीतील बदल सातत्याने सुरूच आहेत. चौथ्या टी-२० सामन्यात अभिषेक शर्मा बाद झाल्यानंतर तिसऱ्या क्रमांकावर शिवम दुबेला फलंदाजीला पाठवण्यात आलं. त्याने झटपट खेळी केली, पण मोठी धावसंख्या उभारण्यात अपयशी ठरला. शिवम दुबेने १८ चेंडूत १२२.२२ च्या स्ट्राईक रेटने २२ धावांची खेळी केली.

## थोडक्यात/ संक्षिप्त



### तुमची स्कीन खूप ग्लो करते! हरलीन देओलचा पंतप्रधान मोदींना मिश्किल सवाल, मोदींनी दिले खास उत्तर...

नवी दिल्ली-भारतीय महिला क्रिकेट संघाने नुकताच इतिहास रचत, पहिल्यांदाच महिला विश्वचषकावर आपले नाव कोरले. या ऐतिहासिक विजयानंतर, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिल्लीत भारतीय महिला क्रिकेट संघाच्या खेळाडूंची खास भेट घेऊन त्यांचे अभिनंदन केले. विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात मवूमन इन ब्लूफ्ने यजमान दक्षिण आफ्रिकेला पराभूत करत हा मोठा बहुमान मिळवला. या विजयाने संपूर्ण देशाची मान अभिमानाने उंचावली आहे. विश्वचषक जिंकल्यानंतर टीम इंडियाच्या सर्व खेळाडूंनी पंतप्रधान मोदींची भेट घेतली. या वेळी, कर्णधार हरमनप्रीत कौर हिच्या नेतृत्वाखालील संपूर्ण संघाने पंतप्रधानांना टीम इंडियाची जर्सी भेट दिली. पंतप्रधान मोदींनी सर्व खेळाडूंचे मन:पूर्वक अभिनंदन केले आणि त्यांच्या कामगिरीचे कौतुक केले. या महत्त्वपूर्ण भेटीदरम्यान, टीम इंडियाच्या महत्त्वाच्या खेळाडूंसह, ज्यात स्मृती मंधाना, दीप्ती शर्मा आणि जेमिमा रॉड्रिग्ज यांचा समावेश होता, मुख्य प्रशिक्षक अमोल मुझुमदार हे देखील उपस्थित होते. पंतप्रधानांनी संपूर्ण टीमला भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. महिला क्रिकेट टीमच्या या ऐतिहासिक कामगिरीमुळे देशातील अनेक तरुणींना खेळाकडे आकर्षित होण्याची प्रेरणा मिळाली आहे, असे मत यावेळी अनेकांनी व्यक्त केले.

मसर, तुमची स्कीन इतकी ग्लो कशी करते?

### ऑस्ट्रेलियाच्या सापळ्यात अभिषेक अडकला, आधी सिक्स मारून दिली, पुढच्या २ बॉलमध्ये खेळ खल्लास!

क्वीन्सलँड-ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या चौथ्या टी-२० सामन्यात



पहिले बॅटिंग करणाऱ्या भारताची सुरूवात चांगली झाली. अभिषेक शर्मा आणि शुभमन गिल या दोन ओपनरनी ६.४ ओव्हरमध्ये ५६ रनची पार्टनरशीप केली, पण त्यानंतर लेग स्पिनर ॲडम झम्पाला मोठा शॉट मारण्याच्या नादात अभिषेक शर्मा आऊट झाला. झम्पाने रचलेल्या सापळ्यामध्ये अभिषेक शर्मा अलगद अडकला.

इनिंगच्या सातव्या ओव्हरच्या दुसऱ्या बॉलला अभिषेक शर्माने झम्पाच्या बॉलिंगवर सिक्स मारला. झम्पाचा या सामन्यातला हा पहिलाच बॉल होता. यानंतर झम्पाने ओव्हरचा चौथा बॉल पुन्हा त्याच टप्प्यावर टाकला, पण त्याने बॉलचा स्पीड कमी केला, ज्यामुळे अभिषेक शर्मा फसला. या बॉलवरही सिक्स मारण्यासाठी अभिषेक मोठा शॉट खेळला, पण बॉलचा स्पिड कमी असल्यामुळे अभिषेकचा शॉट चुकला आणि टीम डेव्हिडने त्याचा कॅच पकडला. २१ बॉलमध्ये २८ रन करून अभिषेक आऊट झाला.

अभिषेकच्या विकेटनंतर टीम इंडियाला एकामागोमाग एक धक्के लागले. शिवम दुबे २२, शुभमन गिल ४६, सूर्यकुमार यादव २० आणि तिलक वर्मा ५ रनवर आऊट झाले.

## भारत आणि ऑस्ट्रेलियामध्ये निर्णायक सामना, टीम इंडिया सामन्यासाठी सज्ज



मुंबई : सूर्यकुमार यादव याच्या नेतृत्वात टीम इंडियाने ५ सामन्यांच्या मालिकेत ऑस्ट्रेलियावर मात करत तिसऱ्या टी २० मध्ये विजयाचं खात उघडलं. सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली टीम इंडियाने तिसऱ्या सामन्यात शानदार खेळ करत ऑस्ट्रेलियावर विजय मिळवला आणि मालिकेत १-१ अशी बरोबरी साधली. रविवारी, २ नोव्हेंबर रोजी झालेल्या या सामन्यात भारताने ऑस्ट्रेलियाच्या दिलेल्या आव्हानाचा पाच विकेट्सने पाठलाग करत विजय मिळवला. पहिल्या सामन्यात झालेल्या पराभवानंतर भारतीय संघाने दमदार पुनरागमन करत मालिकेत परत प्रवेश केला आहे.

आता मालिकेचा चौथा सामना अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. भारताला मालिका जिंकायची असेल, तर हा सामना कोणत्याही परिस्थितीत जिंकणे गरजेचे आहे. मात्र, पराभव झाल्यास भारताच्या हातातून मालिकेचा विजय निसटेल. त्यामुळे दोन्ही संघ या सामन्यासाठी पूर्ण तयारीत असून तीव्र चुरस पाहायला मिळण्याची शक्यता आहे.ऑस्ट्रेलिया आणि भारत यांच्यातील चौथा टी २० सामना गुरुवार, ६ नोव्हेंबर रोजी खेळवला जाणार आहे. भारतीय वेळेनुसार या सामन्याला दुपारी १ वाजून ४५ मिनिटांनी सुरुवात होईल, तर नाणेफेक १ वाजून १५ मिनिटांनी होईल. स्टार स्पोर्ट्स नेटवर्कवरील चॅनेल्सवर सामन्याचे थेट प्रक्षेपण होईल. तसेच, जिओहॉटस्टार ॲपवर लाइव्ह स्ट्रिमिंगची होणार आहे.

कॅरारा ओव्हल मैदानावर तब्बल तीन वर्षांनंतर टी २० आंतरराष्ट्रीय सामना खेळवला जात आहे. या मैदानावर आतापर्यंत फक्त दोन टी २० सामने झाले आहेत - एक ऑस्ट्रेलिया विरुद्ध दक्षिण आफ्रिका आणि दुसरा ऑस्ट्रेलिया विरुद्ध वेस्ट इंडिज. पहिल्या सामन्यात ऑस्ट्रेलियाला पराभव पत्करावा लागला होता, तर दुसऱ्या सामन्यात त्यांनी विजय मिळवला होता. आता भाराविरुद्धचा हा तिसरा सामना असल्याने सर्वांचे लक्ष याच दिशेने लागले आहे. टीम इंडिया या मैदानावर पहिला विजय मिळवून मालिकेत आघाडी घेईल का, हे पाहण्यासाठी क्रिकेटप्रेमी आतुर झाले आहेत.

## कॅप्टन सूर्यकुमार यादव चौथ्या सामन्यात मोठा निर्णय घेणार ?

### उपकर्णधार शुभमन गिलची जागा धोक्यात!

मुंबई : भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील पाच सामन्यांच्या टी २० मालिकेचा चौथा सामना गुरुवारी, ६ नोव्हेंबर रोजी क्वीन्सलँडमधील कॅरारा ओव्हल मैदानावर रंगणार आहे. सध्या मालिका १-१ अशी बरोबरीत आहे, त्यामुळे हा सामना मालिकेचा निर्णायक टप्पा ठरणार आहे.

तिसऱ्या सामन्यात काही बदल करून टीम इंडियाने विजय मिळवला आणि मालिकेत पुनरागमन केलं. आता चर्चेचा विषय आहे तो चौथ्या सामन्याचा संघ. या सामन्यासाठी वन डे टीमचा कॅप्टन आणि टी २० टीमचा व्हाईस कॅप्टन अर्थात उपकर्णधार असलेल्या शुभमन गिलला वगळणार की संघात ठेवणार या प्रश्नाचे उत्तर थोड्याच वेळात मिळणार आहे.

भमनला मालिकेतील पहिल्या तीन सामन्यांत फारशी चमक दाखवता आलेली नाही. त्याने



आतापर्यंत एकूण ५७ धावा केल्या आहेत आणि सलग दहा टी २० सामन्यांत एकदाही अर्धशतक झळकावलेलं नाही. ही कामगिरी ना संघासाठी उपयोगाची ठरत आहे, ना त्याच्या लौकिकाला साजेशी आहे.

अभिषेक शर्मा सतत चांगली कामगिरी करत असताना गिल मात्र संघर्ष करताना दिसतो आहे. त्यामुळे टीम मॅनेजमेंट आता गिलऐवजी संजू सॅमसनला पुन्हा संधी देणार का, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

गौतम गंभीर यांच्या कोचिंगखाली शुभमनला संघात स्थान मिळावे म्हणून संजूच्या ओपनिंग पोजिशनमध्ये बदल करण्यात आला होता. संजू पूर्वी सलामीला खेळत होता, पण गिलच्या पुनरागमनानंतर त्याला मिडल ऑर्डरमध्ये हलवण्यात आलं. मात्र या बदलाचा काही विशेष परिणाम दिसला नाही, उलट तिसऱ्या सामन्यात संजूला संघातून बाहेर बसावं लागलं. आता चौथ्या सामन्यात कर्णधार सूर्यकुमार यादव आणि कोच गंभीर पुन्हा संघरचनेत बदल करतील का, याकडे क्रिकेटप्रेमींचं लक्ष लागलं आहे.

संभाव्य भारतीय संघ : सूर्यकुमार यादव (कर्णधार), शुभमन गिल / संजू सॅमसन, अभिषेक शर्मा, तिलक वर्मा, शिवम दुबे, अक्षर पटेल, वॉशिंगटन सुंदर, जितेश शर्मा (विकेटकीपर), हर्षित राणा, वरुण चक्रवर्ती आणि अर्शदीप


आयसीसी विश्वचषक जिंकणाऱ्या...

## भारतीय महिला क्रिकेटपटूंसाठी टाटाकडून मोठ्ठ गिफ्ट; प्रत्येक खेळाडूंना मिळणार...

मुंबई -भारताच्या महिला क्रिकेट संघाने इतिहास रचला आहे. महिला विश्वचषक २०२५ मध्ये टीम इंडियाने पहिल्यांदाच विश्वविजेतेपद पटकावले. २ नोव्हेंबर रोजी नवी मुंबईतील डी. वाय. पाटील स्पोर्ट्स अकादमी मैदानावर खेळल्या गेलेल्या रोमांचक अंतिम सामन्यात भारताने दक्षिण आफ्रिकेचा ५२ धावांनी पराभव केला आणि वर्ल्ड कप ट्रॉफी आपल्या नावावर केली. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने हा ऐतिहासिक पराक्रम साधला. या विजयानंतर टीम इंडियाला आयसीसीकडून ३९.५५ कोटी रुपये इतकी पारितोषिक रक्कम देण्यात आली, तर बीसीसीआयने देखील संघाला ५१ कोटी रुपयांचे बक्षीस जाहीर केले आहे.विश्वचषक विजयानंतर भारतीय महिला संघावर सन्मान आणि बक्षिसांचा वर्षाव होत आहे. आता टाटा मोटर्सनेही मोठा निर्णय घेतला आहे. कंपनी प्रत्येक खेळाडूला आपली नवीन टाटा सिएरा कार भेट देणार आहे. या कारची किंमत सुमारे १२.५ लाख रुपयांपासून सुरू होते. टाटा मोटर्सचे सीईओ शैलेन्द्र चंद्र यांनी सांगितले, मफभारतीय संघाने आपल्या अद्वितीय खेळाने आणि ऐतिहासिक विजयाने संपूर्ण देशाचे अभिमान वाढवले आहे. त्यांचा प्रवास दृढनिश्चय आणि प्रगतीचे प्रतीक आहे, जो प्रत्येक भारतीयाला प्रेरणा देतो.

**पंतप्रधान मोदींशी विशेष भेट**

विश्वचषक जिंकल्यानंतर भारतीय महिला संघाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. या भेटीत खेळाडूंनी त्यांना मन्रश्द १फ अशी खास जर्सी भेट दिली आणि पंतप्रधानांसोबत संवाद साधला.



भारतीय महिला क्रिकेट संघाच्या सदस्यांनी नवी दिल्लीतील राष्ट्रपती भवनात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतली.

# वॉशिंग्टन सुंदर-शिवम दुबे चमकले! कॅरारा ओव्हलवर भारताचा ऑस्ट्रेलियाला धोबीपछाड

**दिल्ली**-भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील ५ सामन्यांच्या रोमांचक टी-२० मालिकेतील चौथा सामना क्वीन्सलँडच्या कॅरारा ओव्हल मैदानावर खेळवला गेला. ज्या टी२० सामन्यात ऑस्ट्रेलियाचा ४८ धावांनी पराभव करत शानदार विजय मिळवला. या विजयासह भारताने पाच सामन्यांच्या मालिकेत २-१ अशी आघाडी घेतली आहे. भारताने प्रथम फलंदाजी करत २० षटकांत ८ गडी गमावून १६७ धावा केल्या. प्रत्युत्तर ऑस्ट्रेलिया संघाने चांगली सुरुवात करूनही १८.२ षटकांत सर्व गडी गमावून फक्त ११९ धावांवर गारद झाला. ऑस्ट्रेलियाकडून कर्णधार मिचेल मार्शने २४ चेंडूत ३० धावांची खेळी केली. भारतासाठी वॉशिंग्टन सुंदरने ३ विकेट घेतल्या, तर अक्षर पटेल आणि शिवम दुबे यांनी प्रत्येकी २-२ गडी बाद केले.

वादळी सुरुवात नंतर मिडिल ऑर्डर फेल!

चौथ्या टी२० सामन्यात नाणेफेक ऑस्ट्रेलियाच्या बाजूने गेली आणि कर्णधार मिचेल मार्शने प्रथम फलंदाजीसाठी भारताला आमंत्रण दिलं. भारताकडून अभिषेक शर्मा आणि शुभमन गिल यांनी सलामीची जबाबदारी सांभाळली. सामन्याच्या पहिल्याच षटकात बेन ड्वार्शुइसच्या चेंडूवर जेव्हियर बार्टलेटने अभिषेकचा झेल सोडला. मात्र त्यानंतर सातव्या षटकात ॲडम झम्पाने त्याला बाद केले. अभिषेकने २६ धावांची खेळी केली. १० षटकांच्या खेळीनंतर भारताचा स्कोअर ७५ धावा एक बाद असा होता.

जेव्हा बाराव्या षटकात शिवम दुबे २२ धावा करून बाद झाला, तेव्हा भारताला दुसरा धक्का बसला. दुबेनं आपल्या खेळीत एक चौकार आणि एक षटकार लगावला. तर कर्णधार सूर्यकुमार यादवच्या बॅटमधून १० चेंडूंवर २० धावा आल्या. मात्र त्यानंतर भारतीय



संघाचे ४ गडी केवळ १५ धावांच्या अंतराने गमावले. अखेरच्या षटकात अष्टपैलू अक्षर पटेलनं जबरदस्त फलंदाजी करत संघाला सावरण्याचं काम केलं. मार्कस स्टॉइनिसच्या पहिल्याच चेंडूवर चौकार आणि पुढच्या चेंडूवर षटकार ठोकत त्यानं ११ चेंडूंमध्ये २१ झटपट धावा केल्या.शुभमन गिलने केल्या सर्वाधिक धावा

टीम इंडियाकडून उपकर्णधार शुभमन गिल सर्वाधिक धावा करणारा फलंदाज ठरला. सलामीवीर गिलनं ३९ चेंडूंमध्ये ४६ धावा केल्या, ज्यात ४ चौकार आणि १ षटकाराचा समावेश होता. ११८ च्या स्ट्राईक रेटने खेळत त्यानं कांगारू गोलंदाजांची चांगली धुलाई केली. तो अर्धशतक पूर्ण करण्यापासून केवळ ४ धावांनी दूर राहिला. नाथन एलिसनं त्याला माघारी पाठवलं. भारतानं २० षटकांत ८ गडी गमावून १६७ धावा केल्या. ऑस्ट्रेलियाची धमाकेदार सुरुवात, पण शेवट खराब

१६८ धावांचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाच्या डावाची सुरुवात मॅथ्यू शॉर्ट आणि मिचेल मार्श यांनी केली. दोघांनीही दमदार सुरुवात करून संघाला चांगली सुरूवात मिळवून दिली. मात्र, पाचव्या षटकात अक्षर पटेलने शॉर्टला बाद करून भारताला पहिले यश मिळवून दिले. शॉर्टने २५ धावा केल्या. तर नवव्या षटकात अक्षरने पुन्हा एकदा धक्का दिला आणि इंग्लिशला माघारी पाठवले. त्या वेळी ऑस्ट्रेलियाचा स्कोअर ६७ धावा होता. मग शिवम दुबेने महत्वाच्या दोन विकेट घेतल्या, आधी कर्णधार मिचेल मार्श आऊट केले. मार्श ३० धावा करून बाद झाला. मग बाराव्या षटकात दुबेने टिम डेव्हिडलाही बाद केले. टिम डेव्हिड फक्त १४ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला. यानंतर चौदाव्या षटकात अर्शदीप सिंगने फिलिपचा विकेट घेतला, आणि त्यावेळी ऑस्ट्रेलियाचा स्कोअर ९८ धावा होता. १५ व्या षटकात वरुणने ऑस्ट्रेलियाला सहावा धक्का दिला आणि मॅक्सवेलला बाद केले. त्यानंतर सुंदरने स्टोइनिसला आणि पुढच्याच चेंडूवर त्याने बार्टलेटलाही बाद केले, यासोबत सुंदरने शेवटचीही विकेट घेतली.

# केलेल्या विकास कामांच्या आधारे रेणापूर नगरपंचायत निवडणूक आम्ही जिंकू

## जिल्हा बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांचे प्रतिपादन

## काँग्रेस पदाधिकारी बैठकीत केला विजयाचा निर्धार

**लातूर/प्रतिनिधी :** रेणापूर नगरपंचायत निवडणूकीची रणधुमाळी सुरू झाली असून या निवडणुकीत नगरपंचायतीवर काँग्रेसचा झेंडा फडकवण्याच्या दृष्टीने काँग्रेस भवन येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

सदरील बैठकीस लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष,प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रवक्ते माजी आमदार धिरज विलासराव देशमुख,प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस तथा लातूर शहर व ग्रामीण निरीक्षक श्री जितेंद्र देहाडे, जिल्हा काँग्रेस अध्यक्ष अभय साळुंखे,रेणापूर नगरपंचायत निवडणूक निरीक्षक सचिन पाटील यांच्या सह काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते यांची उपस्थिती होती.





सदरील बैठकीत यापुर्वी जाहीर करण्यात आलेले रेणापूर नगरपंचायत निवडणूक प्रभाग निहाय पक्ष निरीक्षकांना नियुक्ती पत्राचे वाटप व त्यासोबतच लातूर ग्रामीण विधानसभा युवक काँग्रेस अध्यक्ष म्हणून श्री विश्वजीत पाटील,किसान सेल लातूर तालुका अध्यक्षपदी श्री रामानंद जाधव,किसान सेल रेणापूर तालुका अध्यक्षपदी श्री दिपक जगदाळे, भादा सर्कल विभाग प्रमुख म्हणून ॲड असगर पटेल यांना निवडीचे पत्र प्रदान करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

रेणापूर नगरपंचायतीच्या माध्यमातून विविध विकासकामांना प्राधांन्य देत नागरिकांना न्याय देण्याच्या भुमीकेतून आम्ही सारे एकसंघपणे या निवडणुकीस सामोरे जात आहोत.एकीकडे भाजपवाल्याची निष्क्रियता व जनतेप्रती असलेली उदासिनता तर दुसरीकडे आम्ही केलेल्या विकास कामाच्या आधारे ही निवडणूक आम्ही जिंकू असा विश्वास यावेळी माजी आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केला.यावेळी प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस जितेंद्र देहाडे, जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष अभय साळुंखे यांनी आपल्या मनोगतातून रेणापूर नगरपंचायत निवडणूक संदर्भात नियोजन सांगून निवडणूकीतील मुद्यावर मार्गदर्शन केले.

## गोल्डक्रेस्ट हाय, लातूरचा आयान दोंतुलवार विभागीय अॅथलेटिक्स स्पर्धेत प्रथम! राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड







**लातूर/प्रतिनिधी :** लातूर विभागीय कनिष्ठ अॅथलेटिक्स स्पर्धा २०२५ मध्ये गोल्डक्रेस्ट हाय, लातूर शाळेच्या चि. आयान दोंतुलवार या विद्यार्थ्याने चमकदार कामगिरी करत शाळेचा आणि संस्थेचा गौरव वाढवला आहे.

दिनांक ५ नोव्हेंबर २०२५ रोजी जिल्हा क्रीडा संकुल, लातूर येथे आयोजित या स्पर्धेत आयान दोंतुलवार याने १०० मीटर आणि २०० मीटर धावस्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवून आपले वर्चस्व सिद्ध केले.

राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

या उत्कृष्ट यशामुळे चि. आयान दोंतुलवार याची राज्यस्तरीय अॅथलेटिक्स स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

या दैदिप्यमान यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा. आ. अमितजी विलासराव देशमुख, विश्वस्त सौ. अदिती अमितजी देशमुख (गोल्डक्रेस्ट हाय, लातूर), शाळेच्या प्राचार्या सौ. उषाकिरण सूद, क्रीडा मार्गदर्शक शुभम गोडगे तसेच सर्व शिक्षकवृंद यांनी चि. आयानचे मनः पूर्वक अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

गोल्डक्रेस्ट हाय परिवारातर्फे आयान दोंतुलवार याच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा!

## मराठवाड्यात स्वराज्य शक्ती सेना पूर्ण ताकदीने निवडणूक लढवणार - स्वराज्य शक्ती सेनेच्या राष्ट्रीय अध्यक्ष करुणा धनंजय मुंडे




**लातूर/प्रतिनिधी :** आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे बिगुल वाजले असून सर्वच राजकीय पक्षांनी आपल्या तयारीला वेग दिला आहे. याच पार्श्र्वभूमीवर स्वराज्य शक्ती सेनेकडून मराठवाड्यात जोरदारपणे उमेदवार उतरवले जाणार असल्याची घोषणा पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा करुणा धनंजय मुंडे यांनी केली. लातूर येथे आयोजित पत्रकार परिषदेमध्ये त्या बोलत होत्या.

या वेळी करुणा मुंडे म्हणाल्या की, आतापर्यंत पारंपरिक नेत्यांनी फक्त स्वतःच्या स्वार्थासाठीच राजकारण केले. पण आता मराठवाड्यात खऱ्या अर्थाने जनतेचे राजकारण घडवण्याची वेळ आली आहे. सामाजिक कार्य करणारे, गोरगरीब, वंचित आणि आतापर्यंत संधी न मिळालेल्या सर्व इच्छुकांनी स्वराज्य शक्ती सेनेत सहभागी व्हावे. अशा सर्वांना आम्ही उमेदवारी देऊन निवडणुकीच्या रिंगणात उतरवणार आहोत.त्यांनी पुढे सांगितले की, नेता तोच आणि त्याचे मुद्दे पण तेच असल्यामुळे व्यवस्था बदलण्यासाठी आता नेता बदलायलाच हवा. स्थानिक समस्यांमध्ये नाली, रस्ते, लाईट, पिण्याचे पाणी, स्वच्छता आदी प्रश्र्न हेच खऱ्या अर्थाने जनतेच्या जीवनाशी निगडित विषय आहेत आणि याच मुद्द्यांवर स्वराज्य शक्ती सेना लढणार आहे.महिला शेतकरी व समाजातील वंचित घटकांवरील अन्यायावर भाष्य करताना त्यांनी तीव्र शब्दांत सरकारवर टीका केली. महाराष्ट्रात महिला शेतकऱ्यांवर अन्याय होत आहे, त्यांना न्याय मिळत नाही. पण जो न्यायासाठी आवाज उठवतो, त्यालाच जेलमध्ये टाकले जाते, असेही त्या म्हणाल्या.या पत्रकार परिषदेस स्वराज्य शक्ती सेनेचे जिल्हाध्यक्ष करण कांबळे, युनूसभाई शेख, प्रगती कांबळे, प्रिया गायकवाड, अनु वाघमारे, सचिन भाले, रामदास सोनवणे, शक्ती आणि धम्मानंद लामतुरे उपस्थित होते.

## भूमी अभिलेख विभागाची १३ व १४ नोव्हेंबर या कालावधीत

# विविध परीक्षा केंद्रावर ऑनलाईन परीक्षा

**लातूर/प्रतिनिधी :** भूमि अभिलेख विभागातील गट क पदसमुह ४ (भूकरमापक) संवर्गातील रिक्त पदे सरळसेवेने भरण्याकरिता १ ऑक्टोबर, २०२५ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्यानुसार १ ते २४ ऑक्टोबर, २०२५ या कालावधीत ऑनलाईन अर्ज स्विकृतीचे कामकाज करण्यात आलेले आहे. या कालावधीत ऑनलाईन अर्ज सादर केलेल्या उमेदवारांची ऑनलाईन परीक्षा (काँम्प्युटर बेसड टेस्ट) १३ ते १४ नोव्हेंबर, २०२५ या कालावधीत महाराष्ट्रातील विविध केंद्रावर घेण्यात येणार आहे. परीक्षेचे विभागनिहाय वेळापत्रक व उमेदवारांच्या परीक्षेचे प्रवेशपत्राबाबत विभागाच्या अधिकृत संकेस्थळावर https://mahabhumi.gov.in या लिंकवर उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. पात्र उमेदवाराने संबंधित संकेस्थळावर देण्यात आलेल्या सूचनानुसार प्रवेशपत्र डाऊनलोड करुन घ्यावयाचे आहे. प्रवेशपत्रावर नमूद परीक्षा केंद्रावर उमेदवरांनी दिलेल्या वेळेत उपस्थित राहून परीक्षा द्यावयाची आहे. परीक्षा केंद्र बदलण्याबाबतच्या कोणत्याही विनंतीचा विचार केला जाणार नाही.

सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ४ मे, २०२२ रोजीच्या शासन निर्णयानुसार ऑनलाईन पध्दतीने (काँम्प्युटर बेसड टेस्ट) परीक्षेचे आयोजन करण्यात येणार असल्यामुळे उमेदवाराच्या परीक्षा केंद्र हे महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही जिल्हा, तालुका अथवा इतर ठिकाणी असू शकते. तसेच काही अपरिहार्य कारणास्तव परीक्षेच्या दिनांकामध्ये बदल झाल्यास त्याबाबतची माहिती विभागाच्या https://mahabhumi.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

परीक्षा पध्दतीबाबतची सविस्तर माहिती पुस्तिका विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येणार आहे. परीक्षेचे प्रवेशपत्र डाऊनलोड करण्याकरिताची लिंक विभागाच्या उपरोक्त संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येणार आहे, असे भूमि अभिलेखचे जमाबंदी आयुक्त आणि संचालक डॉ. सुहासे दिवसे यांनी कळविले आहे.

## महाराष्ट्र खाजगी पदयोजन एजन्सी (विनियमन) अधिनियम २०२५ विषयी हरकती व सूचना सादर करण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र खाजगी पदयोजन एजन्सी (विनियमन) अधिनियम, २०२५ या कायद्यास २८ एप्रिल, २०२५ रोजी मान्यता प्रदान करण्यात आली आहे. राज्यातील सर्वसामान्य नागरिक, खाजगी पदयोजन एजन्सी तसेच संबंधित भागधारक यांनी या प्रारुप नियमांबाबत आपले हरकती, सूचना किंवा अभिप्राय मागविण्यात आलेले आहेत.यासाठी, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालयाच्या https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर देण्यात आलेल्या गुगल फॉर्म (Google Form) लिंकवर ११ नोव्हेंबर, २०२५ रोजी रात्री ११ वाजेपर्यंत संबंधितांनी त्यांच्या हरकती, सूचना किंवा अभिप्राय नोंदविण्याचे आवाहन लातूर येथील जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहाय्यक आयुक्त नि.ना.सूर्यवंशी यांनी केले आहे.

# आगामी निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार लातूर जिल्ह्यात आपली ताकद दाखवून देईल : पाटील

**लातूर/प्रतिनिधी :** आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये लातूर जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार आपली ताकद दाखवून देईल. शरदचंद्र पवारांचा विचारच आम्हाला नेत्रदीपक यश मिळवून देणार असल्याचा विश्वास पक्षाचे नवनियुक्त ग्रामीण जिल्हाध्यक्ष माजी राज्यमंत्री विनायकराव पाटील यांनी गुरुवारी लातुरात पत्रकारांशी बोलताना व्यक्त केला.

लातूर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसच्या ग्रामीण जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी माजी राज्यमंत्री विनायकराव पाटील यांच्यावर सोपविण्यात आली आहे. पाटील यांच्यावर पक्षाच्या नेतृत्वाने ही जबाबदारी सोपवली आणि राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची आचारसंहिता घोषित झाली. त्यामुळे आपल्या नियुक्तीची घोषणा अत्यंत अडचणीच्या काळात झाल्याचे सांगून विनायकराव पाटील पुढे म्हणाले की, आजच्या राजकीय परिस्थितीबद्दल फारसे न बोललेलेच बरे. राज्यात महायुतीच्या सरकारकडून, त्यांच्या मंत्र्यांकडून दिलेली आश्वासने, शब्द पाळले जात नसल्याने सामान्य मतदारांना आता पश्चाताप होत आहे. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्याने मतदार आता महाविकास आघाडीकडे वळताना दिसत आहेत. विद्यमान सरकार – त्यांच्या मंत्र्यांकडून सामान्यांची दिशाभूल केली जात आहे. लोकांना कसे बनवले जात आहे, ते आपण स्थानिक स्वराज्यच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर लोकांसमोर आणणार आहोत. आजही शरदचंद्र पवार यांना , त्यांच्या विचारांना मानणारा मोठा वर्ग राज्यात आहे. शरद पवारांचे विचारच आम्हाला येणाऱ्या काळात विजयी करणार आहेत, असे पाटील यांनी सांगितले.

निवडणुकीच्या तोंडावर आपल्यावर ही जबाबदारी सोपविण्यात आली असली तरी आपण अतिशय कमी कालावधीत जिल्ह्याचा दौरा करून कार्यकर्त्यांच्या भेटीगाठी घेणार आहोत. संघर्षातून यश कसे संपादन करायचे हे आपल्याला माहिती आहे. येणाऱ्या निवडणुका कार्यकर्त्यांसाठीच्या असल्याने जेथे पक्षाची ताकद मोठी आहे तेथे आपण जास्त जागांवर लढण्याचा आग्रह महाविकास आघाडीकडे धरणार आहोत. या निवडणुकीबाबतचा निर्णय स्थानिक – जिल्हा पातळीवर घेण्याच्या सूचना असल्याने परिस्थितीनुरूप निर्णय घेतले जातील. अजित पवारांचा पक्ष आणि एकनाथ शिंदेंची सेना सोडून स्थानिक पातळीवर आघाडी करण्याबाबतही विचार होऊ शकतो. या निवडणुकीच्या माध्यमातून भाजपच्या विचारांना धडा शिकवण्याचा प्रयत्न करू. पक्ष सोडून गेल्यानं आता त्यांच्या चुका समजल्या असून आगामी काळात आपल्या पक्षातील इनकमिंग वाढल्याचे दिसून येईल, असेही त्यांनी सांगितले. सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्यासंदर्भात बोलताना बाबासाहेबांचे कार्यकर्ते कोण तर, त्यांचा मुलगा, भाऊ, पुतण्या हे त्यांच्या घरातील उमेदवारच उभे करण्यासाठी आग्रही राहू शकतात.



परिवाराच्या पुढे त्यांचा पक्षच नसल्याचा आरोप करुन आपल्या घरातून फक्त आपणच राजकारणात आहोत. त्याशिवाय कुटुंबातून कोणीही राजकारणात येणार नसल्याचे त्यांनी बोलून दाखविले . स्थानिकच्या निवडणुकीत जिल्ह्यात आपल्या पक्षाची ताकद लवकरच दाखवून देऊ. कार्यकर्त्यांना न्याय मिळवून देण्याकामी आपण कधीही मागे हटणार नाही,असा विश्वासही विनायकराव पाटील यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाच्या प्रारंभी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवारचे लातूर शहर जिल्हाध्यक्ष राजाभाऊ मणियार यांनी प्रास्तविक केले. यावेळी पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष ॲड. संभाजीराव पाटील , प्रदेश सरचिटणीस बसवराज पाटील नागराळकर, डॉ. बापूसाहेब पाटील, प्राचार्य प्रशांत घार, इंजि. विनायक बगदुरे, मल्लिकार्जुन करडखेले , रशीद शेख, सोमेश्वर कदम, माधव गंगापुरे , बालाजी कदम, प्रदीप खोमणे, ॲड. शेखर हविले, ॲड. निशांत वाघमारे, रामराजे अत्राम , ॲड.इरफान शेख, सलीम घंटे, ॲड. सुरेश साकोळकर, नरेंद्र पाटील, सुदाम पवार, नेमीचंद पाटील, ॲड. आर.झेड. मालपाणी, फेरोज सय्यद, सिराज सय्यद आदींची उपस्थिती होती.

## लातूर केंद्रावरील राज्य नाट्य स्पर्धा १७ नोव्हेंबरपासून

## १३ नाट्य संघांचा समावेश, नाट्य रसिकांसाठी असणार मेजवानी

**लातूर/प्रतिनिधी :** हौशी नाट्य कलावंत आणि नाट्य रसिकांची उत्कंठा वाढवणाया ६४ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धा लातूर केंद्रावर दि. १७ नोव्हेंबरपासून सुरु होत आहे. या स्पर्धेत लातूर जिल्ह्यातील १३ नामवंत नाट्य संघांचा समावेश आहे. ३० नोव्हेंबरपर्यंत रंगणारी ही नाट्य स्पर्धा दर्दीनाट्य रसिकांसाठी सांस्कृतिक मेजवानी असणार आहे.




राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाद्वारे आयोजित या नाट्य स्पर्धेतील दररोज एका नाटकाचा प्रयोग शहरातील मार्केट यार्डातील स्व.दगडोजीराव देशमुख स्मृती सभागृहात दररोज सायंकाळी ७ वाजता असून नाट्य कलावंत आपली विविध विषयांवरील मनोवेधक नाटकं सादर करणार आहेत.

सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड़ आशिष शेलार व सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य नाट्य स्पर्धा पार पडणार असल्याची माहिती सांस्कृतिक कार्य संचालक बिभीषण चवरे यांनी दिली. या स्पर्धेचा नाट्य रसिकांनी उपस्थित राहून हौशी नाट्य कलावंतांचा उत्साह वाढवावा, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

या स्पर्धेत, रे शुन्य म्हणा (अ.भा म.ना परिषद शाखा लातूर), अंतरछिद्र-द ब्लॅक होल(दर्पण मराठी पत्रकार संघ लातूर), महानिर्वाण (दयानंद शिक्षण संस्था लातूर), बेईमानी (धर्मवीर राजे प्रतिष्ठन उदगीर), रातमतरा(डॉ संतुक लाड चॅरिटेबल ट्रस्ट लातूर), घाट (कै. ग्यानोबा शिवराम कोटंबे बहु. सेवाभावी संस्था, हिप्पळनेर), टेडी बिअर (कलारंग लातूर), इथे ओशाळला मृत्यू (माजी विद्यार्थी संघ जयक्रांती अध्यापक महाविद्यालय लातूर), आंबेडकरीझम् (सम्यक बहु.सेवाभावी ज्ञान प्रसारक मंडळ लातूर), विठ्ठला (सविर प्रतिष्ठान लातूर), दास्ताँ(सुधाकरराव कुलकर्णी स्मृति प्रतिष्ठान लातूर), उन्हातलं चांदणं (सूर्योदय बहु. सेवाभावी संस्था लातूर), संकेत मीलनाचा (उन्नती फाऊंडेशन लातूर) या नाटकांचा समावेश आहे.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.

शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# शॉपर्स स्टॉपच्यावतीने ‘इंडिया वेड्स विथ शॉपर्स स्टॉप’ अंतर्गत आकर्षक नवीन विवाह संग्रह लॉन्च

## ग्राहकांना ६ दिवस । ५ रात्री युरोप ट्रिप आणि १ लाखाचे हिऱ्यांचे दागिने जिंकण्याची संधी

**लातूर/प्रतिनिधी :** भारतातील आघाडीचे दर्जेदार फॅशन, सौंदर्य आणि भेटवस्तू मिळण्याचे ठिकाण म्हणून प्रसिद्ध असलेले शॉपर्स स्टॉप मोठ्या अभिमानाने ‘इंडिया वेड्स विथ शॉपर्स स्टॉप’ मोहिमेअंतर्गत आपला भव्य विवाह संग्रह लॉन्च करत आहे. भारतीय विवाहसोहळ्यांची भव्यता आणि विविधता टिपत, या संग्रहात प्रत्येक विवाह इच्छुकासाठी आधुनिक अभिजाततेसह कालातीत नजाकतीचा संगम असलेली उत्पादने तसेच ॲक्सेसरीजची एक क्यूरेटेड श्रेणी उपलब्ध आहे.

‘इंडिया वेड्स विथ शॉपर्स स्टॉप’ कॅम्पेनचा एक भाग म्हणून, ग्राहक आपल्या विवाहाची तयारी करण्यासाठी आवश्यक असलेली प्रत्येक गोष्ट शोधू शकतात. जवळपास ५०० हून अधिक प्रीमियम ब्रँडसह, शॉपर्स स्टॉप लग्नाच्या खरेदीसाठी एक




परिपूर्ण डेस्टिनेशन उपलब्ध करून देते. जे ब्रँडच्या सिग्नेचर पर्सनल शॉपर वेडिंग कॉन्सियर्ज सर्व्हिसद्वारे फॅशन, सौंदर्य, भेटवस्तू आणि घरगुती उत्पादनांसह तज्ज्ञ शैलीचे मिश्रण करते.

इंडिया वेड्स विथ शॉपर्स स्टॉपमध्ये सहभागी होण्याची ५ कारणे–

१. स्वत:च्या गरजेनुसार पर्सनल शॉपर्सद्वारे वेडिंग कन्सिर्ज सर्व्हिस: स्टाईलिंग सहाय्यासाठी तज्ज्ञ वैयक्तिक खरेदीदारांशी संपर्क साधा

२. आंतरराष्ट्रीय ट्रीप – सर्वाधिक खर्च करणाऱ्या टॉप स्पेंडरना ५एन ।६डी युरोपचे हनिमून पॅकेज जिंकण्याची संधी

३. सॉलिटारिओ ज्वेलरी जिंकण्याची संधी – टॉप १० स्पेंडर्सना १ लाख किंमतीची सॉलिटारिओ डायमंड ज्वेलरी जिंकण्याची संधी

४. ६०,००० किंवा अधिकच्या शॉपिंगवर खास ऑफर – १६,००० किंमतीचे ई–गिफ्ट वाऊचर्स

५. विशेष ऑफर पुढील ४०+ ब्रँड्सकडून

१. पेहराव: लुई फिलिप, आरके बाय रितू कुमार, वेरो मोडा, रेअरिझम, डब्ल्यू, कशिश, लिवाईस, पार्क ॲव्हेन्यू, ॲरो, पेपे जीन्स आणि इतर बरेच

२. सनग्लासेस: प्राडा, बरबेरी, मॉन्टब्लँक, डॉल्से अँड गबाना तसेच इतर बरेच

३. हँडबॅग: ज्युसी कॉउचर, स्टीव्ह मॅडेन, अल्डो

४. ब्युटी: एमएसी

५. फूटवेअर: एडिडास ओरिजिनल्स, पुमा, एडिडास, न्यू बॅलेन्स आणि एसिक्स

६. ज्वेलरी: स्पार्कल्स

शॉपर्स स्टॉपचे मॅनेजिंग डायरेक्टर आणि सीईओ, कस्टमर केअर असोसिएट कवींद्र मिश्रा म्हणाले, भारतातील विवाह समारंभ हे रंग, संस्कृती आणि संबंधांच्या संयोगाने साजरे केले जातात. ते पुढे म्हणाले, या लग्नाच्या हंगामात तुम्ही सर्वोत्तम दिसाल याची खात्री करून सर्व विवाह इच्छुकांना आनंदित करण्यासाठी आमच्या ऑफर तयार करण्यात आल्या आहेत.

शॉपर्स स्टॉपद्वारे तुम्ही या लग्नसराई दरम्यान प्रेम, शैली आणि परंपरा साजरी करू शकता. तुमच्या जवळच्या दुकानाला भेट द्या किंवा www.shoppersstop.com वर विशेष ऑफर शोधा आणि तुमच्या लग्नाचा प्रवास खरोखरच अविस्मरणीय बनवण्यासाठी ’इंडिया वेड्स विथ शॉपर्स स्टॉप’ कॅम्पेनमध्ये सामील व्हा.

### बिबट्याच्या हल्ल्यात ३५ वर्षीय तरुणाचा मृत्यू, छिन्न–विच्छिन्न अवस्थेत आढळला मृतदेह; ग्रामस्थ आक्रमक

**पुणे/प्रतिनिधी :** पुणे पाठोपाठ नाशिक तालुक्यातील लोहशिंगवे गावात बिबट्याच्या हल्ल्यात ३५ वर्षीय सुदाम जुंदरे या तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला. पहाटे अंदाजे पाच वाजण्याच्या सुमारास ग्रामस्थांना गावाजवळ छिन्नविछिन्न अवस्थेत सुदाम जुंदरे यांचा मृतदेह आढळला. या घटनेने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. बिबट्याला तत्काळ जेरबंद करण्याची मागणी करत ग्रामस्थ चांगलेच आक्रमक झाले आहेत. गेल्या काही दिवसांपासून लोहशिंगवे परिसरात बिबट्याचा सतत वाढता संचार पाहायला मिळत आहे. यामुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे. याआधीही नाशिक जिल्ह्यातील सिन्नर, देवळाली परिसरात बिबट्याच्या हल्ल्यांमुळे तिघांचा बळी गेला होता. सतत वाढत असलेल्या या घटनांमुळे वन विभागावर नागरिकांचा रोष व्यक्त होत आहे.

## लातूर जिल्हा बँकेकडून शैक्षणिक कर्ज अंतर्गत शेतकऱ्यांच्या ५ मुलांना ४८ लाख रुपये मंजुर

**लातूर/प्रतिनिधी :** राज्यांत नावलौकिक असलेल्या लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून शैक्षणिक कर्ज योजना अंतर्गत जिल्ह्यातील ५ शेतकरी सभासदांना उच्च शिक्षणासाठी ४८ .३३ लाख रुपये आज गुरुवारी झालेल्या बँकेच्या बैठकीत मंजुरी देण्यात आल्याची माहिती जिल्हा बँकेचे अध्यक्ष धीरज विलासरावजी देशमुख यांनी दिली आहे आजतागायत जिल्हा बँकेकडून शैक्षणिक कर्ज अंतर्गत ४६४ शेतकऱ्यांच्या मुलांना २१.६६ कोटी रुपये कर्ज वाटप आलेली आहेत यात परदेशात शिक्षण घेणाऱ्या ३४ शेतकरी मुलांना ५.२६ कोटी रुपये कर्ज वाटप करण्यात आली आहेत

लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून विविध योजना राबवून



शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचे काम करीत असून वेगवेगळ्या योजना राबवून शेतकऱ्यांना न्याय देण्याचा प्रयत्न करत असताना शेतकऱ्यांची मुल उच्च शिक्षण घ्यावेत त्यांना आर्थिक मदत व्हावी यासाठी जिल्हा बँक सतत पुढाकार घेत असते उच्च शिक्षण अंतर्गत किंवा देशांतर्गत किंवा परदेशातील शिक्षणासाठी बँक कर्ज पुरवठा करत असुन त्यात वैधकीय पदवीधर , व पदव्युत्तर, इंजीनियरिंग पदवीधर, स्थापत्य विशारद पदवीधर, वा पदव्युत्तर, एम बी ए, औषधशास्त्र पदवीधर, शिक्षणासाठी बँकेकडून कर्ज मंजुरी दिली जात असून यासाठी शैक्षणिक कर्ज मर्यादेसाठी ८ लाख रुपये,देशांतर्गत वैधकीय पदवीधर यासाठी २० लाख रुपये, वैधकिय पदव्युत्तर शिक्षणासाठी ३० लाख , तर देशाबाहेरील कोर्सेससाठी २५ लाख रुपयांपर्यंत बँकेकडून शैक्षणीक कर्ज पुरवठा होत आहे अशी माहिती जिल्हा बँकेचे चेअरमन माजी आमदार धीरज विलासरावजी देशमुख यांनी दिली आहे.

**७८१६ बचत गटांना ७९ कोटी ७६ लाख रुपयांची कर्ज पुरवठा**

जिल्ह्यातील महिला बचत गटांना आर्थिक पाठबळ मिळावे यासाठी जिल्हा बँक नेहमी वेळोवेळी बचत गटांना आर्थिक पाठबळ देण्याचे काम करत असून लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून ऑक्टोंबर २५ अखेर १६२८५ बचत गट आहेत बँकेच्या बचत खाती २६ कोटी २९ लाख रुपये असून ऑक्टोंबर २५ अखेर बँकेकडून ७७९७ बचत गटांना ७९ कोटी १४ लाख रुपये कर्ज वाटप केले आहेत तर नोव्हेंबर आजच्या दिवशी ६ नोव्हेंबर पर्यंत १९ बचत गटांना ६२ लाख कर्ज मंजूर केलेली आहेत अशी माहिती बँकेचे चेअरमन धीरज विलासरावजी देशमुख यांनी दिली आहे.

### सुप्रसिद्ध गायिका सुलक्षणा पंडित यांचे निधन; वयाच्या ७१ व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला

**मुंबई/प्रतिनिधी :** कधीकाळी बॉलिवूड गाजवून सोडणारी अभिनेत्री आणि आपल्या आवाजाची जादू दाखवून प्रेक्षकांना भूरळ घालणाऱ्या सुप्रसिद्ध गायिका सुलक्षणा पंडित यांचं निधन झालंय. सुलक्षणा पंडित यांनी वयाच्या ७१व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला. प्रकृती अस्वास्थामुळे त्यांना मुंबईतील नानावटी रुग्णालयात दाखल करण्यात आलेलं. तिथेच त्यांनी अखेरचा श्वास घेतला आणि जगाला कायमचं अलविदा म्हटलं. सुलक्षणा पंडित म्हणजे, अभिनेत्री विजेता पंडित आणि संगीतकार जोडी जतिन–ललित यांची बहीण. गायिकेचे भाऊ ललित पंडित यांनी त्यांच्या निधनाच्या वृत्ताला दुजोरा दिला.

## ज्युदो स्पर्धेत लातूरचे ५० खेळाडू करणार प्रतिनिधीत्व

### विभागीय शालेय ज्युदो स्पर्धेची उत्साहात सांगता, तीन जिल्ह्यातील १३१ खेळाडूंनी घेतला सहभाग

**लातूर/प्रतिनिधी :** क्रीडा व युवा सेवा संचनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद लातूर व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय लातूर व्दारे बुधवार, दि. ५ नोव्हेंबर रोजी विभागीय शालेय ज्युदो स्पर्धा संपन्न झाल्या. विभागातील लातूर, धारशिव आणि नांदेड जिल्ह्यातून १४, १७ आणि १९ वर्ष वयोगटाखालील ५० गट सहभागी झाले होते. यामध्ये प्रत्येक गटातील एक प्रमाणे ५० खेळाडू हे राज्यस्तरावर आपल्या विभागाचे प्रतिनिधीत्व करणार आहेत. ज्यूदो हा एक मार्शल आर्ट आणि लढाऊ खेळ आहे. या स्पर्धा ऑलिंपिकमध्ये समाविष्ट आहेत. या खेळ प्रकारामध्ये प्रतिस्पर्धकांना प्रतिस्पर्ध्याला जमिनीवर पाडणे, फेकणे आणि वश करणे आदी डावपेच असतात. आणि त्यामध्ये शारीरिक तंदुरुस्ती, मानसिक शिस्त आणि खिलाडूवृत्तीला महत्त्व दिले जाते. दरम्यान, बुध्वारी



पै. रुस्तम ए हिंद हरिश्चंद्र बिराजदार (मामा) कुस्ती संकुल या ठिकाणी विभागीय ज्यूदो स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेमध्ये लातूर विभागातील नांदेड महानगरपालिका, नांदेड ग्रामीण, लातूर महानगरपालिका, लातूर ग्रामीण आणि धाराशिव असे पाच संघ सहभागी झाले होते.

यामध्ये १३१ खेळाडू सहभागी झाले होते. याशिवाय छत्रपती संभाजीनगर, बीड आणि लातूर येथील पंचांनी स्पर्धेचे निरीक्षण केले. या स्पर्धेत मुलां–मुलींचे १४ वर्ष, १७ वर्ष आणि १९ वर्ष वयोगटाखालील ५० गट सहभागी झाले होते. प्रत्येक गटातून एक खेळाडू प्रमाणे ५० खेळाडूंची शालेय राज्यस्तर स्पर्धा ७ ते १० नोव्हेंबर या कालावधीत शिवछत्रपती क्रीडापीठ महाळुंगे बालेवाडी पुणे या ठिकाणी होणार आहेत, यासाठी निवड झाली आहे.

राज्यस्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमाकांसाठी प्रयत्नशील विभागीय शालेय ज्युदो स्पर्धेत मला १४ वर्षा खालील वयोटात सुवर्णपदक प्राप्त झाले आहे. यामुळे माझी राज्यस्तरावरील स्पर्धेसाठी निवड झाली आहेत. या स्पर्धेतही मी ताकदीने लढून लातूर विभागासाठी प्रथम क्रमांक पटकाविण्यासाठी प्रयत्नशील आहे.

**–प्रिन्स सोनवणे, ज्यूदो खेळाडू**

## लातूर जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

**लातूर/प्रतिनिधी :** कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी केशव नेटके यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) व (३) नुसार संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी केले आहेत. हा आदेश संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत ६ नोव्हेंबर, २०२५ रोजीच्या ००.०१ वाजेपासून ते २० नोव्हेंबर, २०२५ रोजीच्या २४.०० वाजेपर्यंत (दोन्ही दिवस धरुन) लागू राहील.

शस्त्रबंदी व जमावबंदी काळात या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत घेऊन फिरता येणार नाही. कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ बाळगता येणार नाही, दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे, सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे बाळगणे किंवा जमा करणे किंवा तयार करण्यास मनाई राहील. व्यक्तीचे प्रेत, आकृत्या किंवा प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. तसेच जाहीरपणे घोषणा करणे, गाणे म्हणजे वाद्य वाजविण्यास मनाई राहील. ज्यामुळे सभ्यता अगर नितीमत्ता यास धोका पोहोचेल अशा किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा ज्यामध्ये उलथवून टाकण्याची प्रवृत्ती दिसून येत असेल अशी आवेशपूर्ण भाषणे, हावभाव करणे, सोंग आणणे, चित्रे, चिन्हे फलक किंवा इतर कोणत्याही जिन्नस किंवा वस्तू तयार करणे, त्यांचे प्रदर्शन किंवा प्रसार करणे यास मनाई करण्यात आली आहे.

जिल्ह्यात सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था राहण्यासाठी कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास, मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे. हा आदेश अंत्ययात्रा, विवाह, कामावरील पोलीस किंवा इतर शासकीय अधिकारी, कर्मचारी यांना लागू राहणार नाही. तसेच शस्त्रबंदी व जमावबंदी काळात सभा, धार्मिक मिरवणूक, मोर्चा, उपोषण यांना परवानगी देण्याचे सर्व अधिकार हे पोलीस अधीक्षक, पोलीस उपअधीक्षक व संबंधित पोलीस निरिक्षक, पोलीस उपनिरीक्षक यांना राहतील. त्यांनी परवानगी देण्यापूर्वी उपविभागीय दंडाधिकारी यांच्याशी सल्लामसलत करून परवानगी द्यावी, असे अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे.

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात अहमदपूरच्या असंख्य कार्यकर्त्यांचा प्रवेश

**अहमदपूर/प्रतिनिधी :** येत्या काही दिवसात अहमदपूर नगरपालिकेच्या निवडणुका पार पडणार आहे त्यामुळे अहमदपूर शहरात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अनेक पक्ष प्रवेश होत आहेत. राज्याचे सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत अहमदपूर शहरातील प्रभाग क्रमांक ८ मधील रफिकभाई खुरेशी,युनुस खुरेशी,रतन खुरेशी,अजहर खुरेशी, कासीमभाई खुरेशी पठाण मजिदसाब, शेख अहमदभाई,पठाण मुकरमभाई, खुरेशी तौसीफ,खुरेशी ईस्माईल, खुरेशी अबुबखर, खुरेशी बबलू, खुरेशी तनवीर,शेख युनुस,खुरेशी अमान, खुरेशी खदीर,अरबाज खुरेशी, नावेद खुरेशी, खुरेशी सोफीयान, साहेबलाल खुरेशी,पठाण युसुफभाई, जुबेर खुरेशी,हादी शेख,शेख आरेफ, शेख समीर, खुरेसी सलमान,खुरेशी मुस्तान, खुरेसी करीम, खुरेशी कैफ आदिनीं राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. सर्व प्रवेश करणाऱ्या कार्यकर्त्यांचे सहकार मंत्री ना. पाटील यांनी स्वागत करत शुभेच्छा दिल्या.

यावेळी शिवानंद हेंगणे (प्रदेश सरचिटणीस) शिवाजीराव देशमुख (तालुकाध्यक्ष) सय्यद एजाज (अल्पसंख्याक जिल्हा उपाध्यक्ष ),अभय मिरकले, लक्ष्मीकांत कासनाळे, रहिम पठाण, जावेद बागवान, बालासाहेब पाटील अंबेगावकर, राम नरवटे, हरीभाऊ कदम सह विविध मान्यवर उपस्थित होते.




### युध्दा ..

तिकीट वाटपी सूत्र
बिगुल वाजले युध्दा
चिलखतघालून रेडी
हरेक पक्षांचा योध्दा

जोखीम नको काही
बुजवा सूक्ष्मशा छेदा
सव्यसाचीआवश्यक
उदीष्ट वर्मावरी भेदा

कोण फुटीर लपलेले
युध्दा आधी ते शोधा
घोळात आणेल सर्वां
आत बट्टयाचा सौदा

तोटाही घ्यावा वाटून
सर्वां समतोलफायदा
बनावे लागते कठोर
करत असता कायदा

स्पटिकासमान पाणी
रे नसावा आडपडदा
विसरा कटू इतिहास
उकरू नकात मुडदा

महत्व आपले दाखवे
दुर्बळ असेना प्यादा
असो बळीचा बकरा
कुमक धमक ज्यादा

मान सन्मान सर्वांचा
सांभाळा जसला हुद्दा
टाळा गाळा हर वेळा
प्रत्येक वादाचा मुद्दा

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

निलंगा शहरातील एलआयसी विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स, जनता दवाखान्यासमोर शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396

टोनर रिफिलिंग

फक्त ₹ ३००/-
मास्टरप्लेट ट्रेसिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी–५२/२४–२६